सकाळ

NiE NEWSPAPER IN EDUCATION

# चेहऱ्यावर उमलला ख्रिसमस

प्रत्येक सण उत्साहानं आणि आनंदानं साजरा करण्याची आपली परंपरा. ख्रिसमस हा सणसुद्धा असाच. येशू ख्रिस्त यांचा जन्मदिवस म्हणून नाताळ किंवा ख्रिसमस हा सण २५ डिसेंबर रोजी जगभर साजरा केला जातो. यादिवशी घरांना रोषणाई केली जाते, खाऊ आणि भेटवस्तू वाटल्या जातात. लाडक्या सांताक्लॉजची वाट पाहणाऱ्या बच्चेकंपनीचा उत्साह तर या वेळी शिगेला पोहोचलेला असतो. ख्रिसमस पूर्वसंध्येला सजावट साहित्याने बहरलेल्या एका दुकानासमोर दंगामस्तीत रमलेल्या या मुलांच्या चेहऱ्यावर खऱ्या अर्थाने ख्रिसमस दिसत होता.



विश्वजित पवार : सकाळ छायाचित्रसेवा

## ख्रिसमस ट्री

**नाताळ साजरा करताना 'ख्रिसमस ट्री' सजवण्याची परंपरा आहे. हिरव्या रंगाच्या या सूचीपर्णी वृक्षाला नाताळचे झाड म्हणूनही ओळखले जाते.**

पूर्वी ख्रिसमस ट्रीवर फक्त कागदी रंगीत फुले आणि फळे अडकवली जायची. कालांतराने यामध्ये बदल होत गेला. आता विजेच्या दिव्यांची माळ, चमकीच्या कागदी बाहुल्या, चॉकलेट, केकचे बॉक्स, रंगीबेरंगी रिबीन असे सजावटीचे साहित्य अडकवले जाते.






## प्रेमळ आजोबा

चौथ्या शतकातील ग्रीक धर्मगुरू संत निकोलस हे त्यांच्या भक्तांना भेटवस्तू देत. त्यांच्यापासूनच आधुनिक काळात सांताक्लॉजच्या संकल्पनेचा उदय झाला असावा असे मानले जाते. प्रेमळ आजोबांसारखी असलेली ही संकल्पना नातवंडांसारख्या मुलांनी प्रेमाने आपलीशी केली. त्यामुळे सांताक्लॉज जगभर पोहोचला.

## सांताक्लॉजचा पोशाख

सांताक्लॉजच्या अंगावर लाल रंगाचा आणि पांढऱ्या फरचा पोशाख असतो. लांब पांढरी दाढी आणि डोक्यावर गोंड्याची लाल भडक टोपी असते. सांताक्लॉज वयस्कर असेल तर क्वचित त्याच्या चेहऱ्यावर काळा चष्मा असतो. पायात काळे बूट आणि कंबरेला काळा पट्टा. हातात किंवा पाठीवर एक मोठी गोणी आणि त्या गोणीत मुलांसाठी खाऊ किंवा खेळणी असं त्याचं रूप असतं.

## सांताक्लॉजचे घर

थॉमस नॉस्त नावाच्या एका लेखकाने सांताक्लॉजचे घर बर्फात असते अशी संकल्पना मांडली. आपल्याला काय काय भेटवस्तू हव्या आहेत, त्याची यादी सांताक्लॉजच्या पत्त्यावर पाठवायची आणि मग ख्रिसमसच्या रात्री सांताक्लॉज सगळी खेळणी घेऊन आपल्या घरी येतो अशी मुलांची समजूत आहे.

सकाळ
NiE NEWSPAPER IN EDUCATION
जाहिरात देण्यासाठी संपर्क साधा
9881098448
9619926669

## शिक्षणाचे महत्त्व

**विद्यार्थ्यांमध्ये अचूक निर्णय घेण्याची क्षमता विकसित करण्याचे साधन म्हणजे शिक्षण होय, असे कार्ल वायमन यांनी म्हटले आहे. शिक्षणामुळे बुद्धी, वाणी, मन आणि विचारशक्ती यांच्यावर सखोल परिणाम होतो.** ज्ञान व आत्मविश्वासाच्या जोरावर एखाद्या विषयाचे सखोल ज्ञान आपल्याला मिळते. आपली समाजव्यवस्था गुरुकुल आणि आश्रम पद्धतीमधून विकसित होत आता 'ग्लोबल' झाली आहे. प्रगतीच्या या समृद्ध मार्गावर वेगाने जात असताना शरीराला श्रमाकडे, बुद्धीला मनाकडे आणि हृदयाला भावनेकडे वळवणे म्हणजे शिक्षण असते. हा मूलभूत सिद्धांत आपण आवर्जून लक्षात ठेवायला हवा. शिक्षण हे असे अस्त्र आहे, ज्याच्या साह्याने आपण अवघे जग जिंकू शकतो. या जगात स्वतःचे अस्तित्व निर्माण करू शकतो. स्वतःच्या क्षमता विकसित करू शकतो.

आपल्याला शिक्षणामुळे ज्ञान मिळते आणि त्या ज्ञानामुळे आपली अचूक निर्णय घेण्याची क्षमता विकसित होते. माझे वडील म्हणतात, 'आपल्याला ज्ञानाचा अमूल्य साठा मिळवण्यासाठी आत्मविश्वास आणि ध्येय हवे. आत्मविश्वासाच्या आणि प्रयत्नांच्या जोरावर आपण हवे ते साध्य करू शकतो.' एक पेन, एक पुस्तक आणि एक शिक्षक अवघे जग बदलू शकतो हा नोबेलविजेत्या मलाला युसुफझाई हिचा विचार आहे. तेच अवघ्या शिक्षणव्यवस्थेचे सार आहे.

**- प्रगती सिद्धेश्वर गोसावी,** नववी
सो. स. महाजन शेतकी प्रशाला मांडवगण, ता. श्रीगोंदा, नगर



## शेकोटी आवडे मला

मला शेकोटीभोवती बसायला खूप आवडते. पण, बाबा म्हणतात, थंडी पडल्याशिवाय शेकोटी पेटवणार नाही. दरवर्षी हिवाळा आला, की कधी एकदा शेकोटी पेटवेन असं मला होतं. आमचं घर शेताच्या मधोमध आहे. त्यामुळे आमच्या घराभोवती खूप थंडी असते. पण, मोठ्या माणसांना पटकन थंडीच वाजत नाही. मी लहान आहे, म्हणून मला पटकन थंडी वाजते. मी आईला कितीतरी वेळा विचारलं, 'आई आई, मी शेकोटी पेटवू का ?' तर आई म्हणते, 'बाबांना विचार.' बाबांना विचारायची तर मला भीती वाटते. पण, चार-पाच दिवसांपासून आमच्या इथं इतकी थंडी पडली आहे की मोठे लोकही थंडीनं थरथर कापू लागले आहेत. आज्जी तर संध्याकाळी सहा वाजताच शेकोटी पेटवते आणि रात्री उशिरापर्यंत शेकोटीजवळच बसते. मग मी आणि माझा छोटा भाऊ बबलू आम्ही दोघंही शेकोटीभोवतीच अभ्यास करायला बसतो. भल्या पहाटे आजोबांनी शेकोटी पेटवलेली असते. मी सकाळी झोपेतून उठले, की लगेच शेकोटीपाशी जाऊन बसते. आई खूप वेळा मला आवाज देते. 'दीदी उरक लवकर. शाळेला उशीर होतोय.' असं म्हणत असते. पण, मला शेकोटीजवळून उठायलाच नको वाटतं. शेकोटीजवळून उठले की थंडी वाजू लागते. तरीही शाळेत जावंच लागतं ना! म्हणून मग मी उठते आणि ब्रश आणि अंघोळ करून शाळेचे कपडे घालून पुन्हा शेकोटीजवळ येऊन बसते. पुन्हा शेकोटीपाशी बसलेलं पाहून बाबा काठी घेऊन माझ्या मागे पळतात. मग मात्र मी दप्तर घेऊन वेगाने शाळेकडे पळत जाते. बाबांना घाबरून माझी थंडी कुठल्या कुठं पळून गेलेली असते.

**- आनंदी लाड,** कोपरगाव




## COLOURS OF NATURE

A walk-through nature can always help you relax. With lush green meadows, rustling leaves, delicate flowers in vibrant colours, melodious birds chirping, sunlight filtering through dark green leaves and the autumn atmosphere warming our hearts, the aroma of flowers embraces. In today's world, we often underestimate ourselves, overlooking the beauty around us. The uneven shapes and colours of nature are its imperfections, yet they are what make it beautiful. As a wise person once said, it's your imperfections that make you perfect. If you wish to find happiness, be grateful, love yourself and then I promise you will be the happiest person alive.

**- VANYA OSWAL,** Grade - 7,
Dr. D. Y. Patil Academy's, Shantiniketan School, Morewadi, Kolhapur



## खाऊचा डबा



**मधल्या सुट्टीत डबा खाणं ही खूप आनंदाची गोष्ट असते. आम्ही सर्व मित्र-मैत्रिणी मिळून डबा खातो.** प्रत्येकाच्या डब्यात वेगवेगळा खाऊ असतो. आमच्या शाळेत पोळी-भाजी, पुलाव, भात, थालिपीठ असे पौष्टिक पदार्थच डब्यात आणण्यास परवानगी आहे. फक्त शनिवारी आम्हाला दुसरा कुठला तरी खाऊ नेता येतो. त्या वेळी आई मला पोहे, उपमा, कधी तरी मॅगी असे पदार्थ करून देते. माझा मित्र सोहमच्या डब्यातली भेंडीची भाजी मला खूप आवडते. त्याची आई ती भाजी खूप छान करते. सोनलच्या आईच्या हातचे पोहेही मला आवडतात.


माझी आई पावभाजी खूप छान करते. त्यामुळे माझ्या डब्यातली पावभाजी सगळे जण खूप आनंदाने खातात. उन्हाळ्याच्या सुट्टीत आम्ही कुठल्या तरी एका मित्राच्या घरी जमून डबा पार्टी करतो. त्याबरोबरच विविध शहरांच्या नावांच्या भेंड्याही खेळतो. क्रिकेट, कॅरम असे खेळही खेळतो. एकत्र जमून खाऊ खाल्ल्याने मैत्री वाढते, असं माझी आई म्हणते. त्यामुळे आम्ही नेहमी गोल करून बसतो आणि डबा खातो. त्यानंतर थोडा वेळ खेळतो. कधी एखाद्या मुलाने डबा आणला नसेल, तर त्याला आमच्यातला खाऊ देतो. मला आमच्या शाळेतली ही डबा पार्टी खूप आवडते. शाळेला खूप दिवस सुट्टी असली की, डबा पार्टीची आठवण येते. कधी तरी आमच्या बाईदेखील आमच्यात सहभागी होतात. त्यामुळे आम्हालाही खूप मजा येते.

**- आदित्य बेडेकर,** नाशिक





**संध्या वणवे,** सहावी,
न्यू इंग्लिश स्कूल, वडगाव मावळ, पुणे





**वेदिका पिसे,** सातवी
शांतिनिकेतन स्कूल, मोरेवाडी, कोल्हापूर





**स्तुती करमळकर,** सहावी,
सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट स्कूल, नगर

? २ शिक्षणाने कोणती क्षमता निर्माण होते?

✔ ४ जगातील सर्वांत उंचीवर बांधलेल्या धरणाचे नाव 'ग्रेट डिक्सेन्स' आहे.

# बदलांचा स्वीकार करू !



**दोस्तांनो, आपल्या कळत-नकळतपणे अवतीभवती खूप बदल घडत असतात. त्यातले काही बदल आपल्याला आवडतात, तर काही आवडत नाहीत. मात्र, बदल घडत असतात. तुम्हालासुद्धा हे जाणवत असेल. शाळेत तुमच्या बसण्याचा बाक कोणी बदलला किंवा घरात तुमच्या एखाद्या वस्तूची जागा बदललेली तुम्हाला आवडत नसेल. तुम्ही अशा बदलांना विरोधही करत असाल, पण प्रत्येक वेळी त्या बदलांना रोखणं, ते होऊच नये यासाठी प्रयत्न करणं आपल्याला जमत नाही. त्यामुळे बदलांना स्वीकारून पुढे जायला हवं. हे कसं जमू शकतं, ते आपण पाहूया.**

## संधी ओळखा

बदल म्हणजे एक नवी संधी असते. फक्त ती ओळखता आली पाहिजे. एखाद्या गोष्टीत बदल होतो, तेव्हा त्यातून नव्या शक्यता निर्माण होतात. उदाहरणार्थ - तुम्हाला एखादा विषय शिकवणाऱ्या शिक्षकांच्या जागी काही कारणास्तव नवीन शिक्षक येतात. त्या वेळी जुन्या शिक्षकांची आठवण तुम्हाला येते. ते साहजिक आहे. मात्र, नवीन शिक्षकांशी तुम्ही जुळवून घेतलं तर त्यांच्या नवीन पद्धतीमुळे तुम्हाला विषय समजण्यास मदतही होऊ शकते.

## बदलांची सुरुवात

प्रत्येक वेळी काही तरी बदल घडेल आणि मग मी त्यानुसार वागेन याची वाट बघू नका. तुमच्या प्रगतीसाठी, आरोग्यासाठी, बौद्धिक क्षमतेसाठी जे बदल आवश्यक आहेत, पोषक आहेत, ते तुम्ही स्वतः घडवून आणा. कोणाचीही वाट न बघता त्या बदलांना लगेच सुरुवात करा. त्यामुळे आपल्यासाठी नक्की काय आवश्यक आहे आणि काय नको आहे, याचा हिशेब करणं सोपं जाईल. जास्तीत जास्त चांगल्या सवयी तुम्ही आत्मसात करू शकता.

## भीती नको

बरेच लोक बदलांना घाबरतात. त्यामुळे त्यांच्या आयुष्यात नवीन काहीच घडत नाही. सगळ्या गोष्टी आपल्या सोयीनेच घडल्या पाहिजेत, असा आग्रह कोणीही धरू शकत नाही. कारण वास्तवात तसं होत नाही. त्यामुळे ऐन वेळी एखादी गोष्ट बदलणार हे गृहीत धरायला हवं. बदल झाल्यावर तो स्वीकारून त्यानुसार पुढे काम करायला हवं.

## स्वप्न आणि सत्य

यशाची कल्पना ही प्रत्येकाची वेगळी असली, तरी तुम्हाला प्रत्येकाला यशस्वी व्हायचं आहेच. तुम्ही परीक्षेत पहिले आले आहात, आई-बाबा तुम्हाला तुमची आवडीची वस्तू देताहेत, सगळे जण तुमचं कौतुक करत आहेत.. अशा किती तरी कल्पना तुम्ही मनाशी रंगवत असाल. मात्र, हे करणं आवश्यक आहे, हे तुम्हाला माहीत आहे का? यशाची कल्पना, स्वप्नरंजन केल्याने आपलं मन आपोआप त्या दिशेने प्रयत्न करू लागतं.

## झाले, गेले, विसरून जावे...

'झाले, गेले, विसरून जावे, पुढे पुढे चालावे... जीवनगाणे गातच राहावे' ही ओळ तुम्ही खूपदा ऐकली असेल. जे घडून गेलं आहे, त्याचा फारसा विचार न करता पुढे जाणं हे बदलांना सामोरं जाण्यामागचं यशस्वी गमक आहे. जे घडून गेलंय त्यातून योग्य तो बोध घेऊन पुढची कृती केली, तर मागील गोष्टींचा त्रास होत नाही. चांगले बदल होतात आणि त्याचा अपेक्षित परिणामही दिसून येतो.

**मित्र-मैत्रिणींनो, बदल कसे स्वीकारायचेत आणि त्यामुळे काय घडू शकतं हे अधिक सविस्तरपणे जाणून घेण्यासाठी तुम्ही 'हू मूव्हड माय चीज?' हे गाजलेलं पुस्तक अवश्य वाचा आणि त्यानंतर तुम्हाला त्यातील कोणता भाग अधिक आवडला ते आई-बाबांना सांगा.**

# शिवरायांचा आठवावा प्रताप

**शिवरायांच्या इतिहासातील प्रत्येक घटना प्रेरणा देणारी आहे. म्हणूनच असे म्हणले आहे, 'शिवरायांचे आठवावे रुप! शिवरायांचा आठवावा प्रताप! शिवरायांचा आठवावा साक्षेप! भूमंडळी!!' राजांनी १६५९मध्ये असा पराक्रम घडवला तो दिवस 'शिवप्रताप दिन' म्हणून ओळखतात. भल्या मोठ्या संकटातून मार्ग कसा काढायचा? प्रतिकूल परिस्थितीत जिंकायचे कसे हेच शिवरायांनी शिकवले. आपण बघूया शिवप्रताप..**

■ **सौरभ कर्डे**

**स्वराज्याचा वाढणारा आलेख शत्रूच्या मनात धडकी भरवणारा होता. 'शिवाजीला रोखलं नाही तर एक दिवस तो आदिलशाहीला बुडवेल..' अशी भीती आदिलशाही दरबाराला बसली.** अन् विजापूरवरून मोहिमेचा विडा उचलून एक सरदार साधारण २५ हजारांपेक्षा जास्त फौज घेऊन, स्वराज्य नष्ट करण्यासाठी निघाला. 'सिवा को जिंदा या मुरदा दरबार मे हाजीर करूंगा' अशी प्रतिज्ञा त्याने घेतली. एखादं वादळ रोंरावत यावं तसा शत्रू स्वराज्य उध्वस्त करायला आला. त्या सरदाराचं नाव अफजलखान...

अफजलखानाविरुद्ध लढताना शिवरायांनी कोणत्या नीती, योजना आखल्या ते पाहूया..

**संयम :** राजांचा हा गुण प्रत्येकाने शिकावा असा. अफजलखानाने स्वराज्यात यायच्या आधी, तुळजापूर, पंढरपूर या देवस्थानांना उपद्रव दिला. सारासार विचार करून संयम बाळगत महाराजांनी पुढच्या योजना केल्या.

**राष्ट्रकर्तव्याची भावना :** या मोहिमेदरम्यान सईबाई यांचे निधन झाले. राजांनी कुटुंबापेक्षा स्वराज्याला प्राधान्य देऊन ते शत्रूशी लढण्यासाठी पुढे आले.

**अभ्यास :** राजे शत्रूच्या प्रत्येक हालचालीचा, फौजेचा, अफजलखानाच्या वर्तणुकीचा अभ्यास करत होते. आपण काय केलं की शत्रू कसा वागेल? त्याच्याभोवती कोण असते? त्याचा स्वभाव कसा? त्याचे वाईट गुण कोणते? तो कुठे फसू शकतो? या सगळ्याचा राजांनी बारकाईने अभ्यास केला.

**योजना :** गनिमी कावा अन् सह्याद्रीच्या मुलुखात बोलवून शत्रूची कोंडी करून त्याला मारायचं. शत्रूला बेसावध करण्यासाठी महाराजांनी घाबरल्याचे नाटक केले.

**भूगोलाची मदत :** जावळी हा सह्याद्रीतला प्रचंड घनदाट जंगलाचा परिसर. त्यामध्ये युद्ध अथवा लढाई करणे आदिलशाही फौजेला जमले नसते. छत्रपती शिवाजीराजे प्रतापगडावर गेले. आणि त्यांनी चातुर्याने अफजलखानाची फौज जावळीत आणली. तसेच, भेटीच्या जागेचे ठिकाण ठरले.

**रणनीती :** भेटीच्या आदल्या रात्री मराठ्यांची फौज जावळीच्या विविध भागांत लपली. तोफ वाजली की हल्ला करायचा या उद्देशाने. खानाचे सैन्य ज्या वाटांनी पळून जाऊ शकत होते, ते रस्ते, वाटा, घाट, मोठी झाडे तोडून, दगड धोंडे, ओंडके टाकून बंद करण्यात आले. शत्रू कोंडला गेला.

अफजलखानाच्या भेटीला जाताना सावधानता म्हणून राजांनी चिलखत व जिरेटोप घातला. शत्रूने दगा केला तर प्रतिकार करण्यासाठी 'बिचवा व वाघनखे' घेतली. भेट होताच तोफ वाजवायची योजना केली. भेट झाली.. दिवस होता मार्गशीर्ष शुद्ध सप्तमी. भेटीच्या वेळी गाफिल अफजलखानाने राजांना मिठी मारली व त्यांच्यावर कट्यारीचा वार केला. एका क्षणात शिवरायांनी वाघनखं त्याच्या पोटात खुपसली व बिचवा मारून त्याचा कोथळा बाहेर काढला. प्रतापगडच्या पायथ्याला मोठे युद्ध झाले. अफजलखान मेला. आदिलशाही हरली. किल्ले प्रतापगडच्या या शिवप्रतापाचा अनुभव व अभ्यास करायचा असेल तर पुणे येथील आंबेगावच्या शिवसृष्टीला भेट द्यायला विसरू नका.

*(लेखक शिवव्याख्याते आहेत.)*






**मित्रमैत्रिणींनो, उंच आभाळात उडावं, आकाशातून पृथ्वी कशी दिसते ते पाहावं, असं तुम्हाला वाटतं? तसं वाटत असेल, तर वैमानिक होऊन तुम्ही तुमचं हे स्वप्न पूर्ण करू शकता. हो, पण वैमानिक होणं काही सोपं नाही बरं का? त्यासाठी तुम्हाला अभ्यास, शिस्त आणि व्यायाम या तिन्ही गोष्टी आत्तापासूनच गांभीर्याने पाळाव्या लागतील.**

# तुम्हाला वैमानिक बनायचंय?

## वैमानिक कसं व्हायचं ?

वैमानिक होण्यासाठी गणित आणि भौतिकशास्त्र हे विषय घेऊन तुम्ही बारावी उत्तीर्ण असायला हवं. त्यानंतर नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाची प्रवेश परीक्षा उत्तीर्ण व्हावं लागतं. तिथे लेखी आणि प्रात्यक्षिक अशा दोन परीक्षा द्याव्या लागतात. या परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर पाच वर्षांच्या आत उड्डाण प्रशिक्षणातही उत्तीर्ण व्हावे लागते. प्रात्यक्षिक परीक्षेत २०० तासांचे विमान उड्डाण पूर्ण करावे लागते. यामध्ये विमान चालवणे, टेकऑफ, लँडिंग, रात्री विमान चालवणे यांचा समावेश असतो.

## भरपूर अभ्यास

**लेखी परीक्षेत रेडिओ, तंत्रज्ञान, हवाई नियमन, हवामानशास्त्र आणि हवाई नेव्हिगेशन अशा पाच विषयांचा अभ्यास असतो. विमान हवेतून वेगवेगळ्या प्रदेशात जात असतं. त्यामुळे तुम्हाला हवामानाचा आणि भूगोलाचाही चांगला अभ्यास असावा लागतो. अंतर, वेळ, उंची, लांबी अशा बऱ्याच गोष्टींवर लक्ष ठेवावं लागतं. त्यामुळं तुमचं गणितही उत्तम असावं लागतं. वैमानिक होण्यासाठी तंत्रज्ञानाचा चांगला अभ्यास असावा लागतो आणि बहुतेक मार्गदर्शक तत्त्वे इंग्रजीतून असल्यानं तुम्हाला इंग्रजीही व्यवस्थित जमायला हवं. म्हणूनच वैमानिक होण्याचं स्वप्न असेल, तर आत्ताच भरपूर अभ्यास करायला हवा की नाही?**



## शिस्तबद्ध नियोजन

वैमानिक होणं ही काही साधी सोपी जबाबदारी नाही बरं का ? तुम्ही जर प्रवासी विमानाचे वैमानिक झालात तर शेकडो प्रवाशांची जबाबदारी तुमच्यावर असते. तुम्ही विमानाचे कॅप्टन असता. त्यामुळे तुम्ही शिस्तबद्ध असणं गरजेचंच असतं. वेळ आणि नियम पाळणं, बोलण्याची पद्धत सारं काही शिस्तीतच असायला हवं. तरच तुम्ही इतरांकडून नियमांची अंमलबजावणी करून सर्व प्रवाशांना निश्चित ठिकाणी पोहोचवू शकता. हे तेव्हाच होतं, जेव्हा तुमच्यामध्ये हलगर्जीपणा नसतो. त्यामुळे वैमानिक होण्यासाठी आत्तापासूनच शिस्तप्रिय होणं गरजेचं आहे.



**कनिष्ठ सह वैमानिकाला सुरुवातीला १ ते २ लाख रुपये पगार मिळतो.**

**मुख्य वैमानिकाला कमीत कमी तीन लाख रुपये पगार मिळतो.**

**वैमानिक बनविणारे प्रशिक्षक दर महिन्याला दहा ते बारा लाख रुपये कमावतात.**

**परदेशात सहवैमानिक म्हणून काम केले तर महिन्याला आठ ते दहा लाख रुपये पगार मिळू शकतो.**

**व्यायाम** गरजेचाच : व्यायाम करणाऱ्या मुलांची बुद्धी तल्लख असते. ते कोणत्याही अडचणीच्या काळात इतरांना मदत करू शकतात आणि स्वत:चाही जीव वाचवू शकतात. विमान चालवणं हे जरी बुद्धी आणि तंत्रज्ञानाचं काम असलं तरी तुम्ही जेवढे तंदुरुस्त असाल तेवढे उत्तम विमान उडवू शकता. वेगवेगळ्या प्रदेशात, वेगळ्या वातावरणात गेल्यावर आजारी पडू नये म्हणून व्यायाम अगदीच महत्त्वाचा आहे. म्हणून मोठं झाल्यावर तुम्हाला वैमानिक बनायचं असेल तर आत्तापासूनच व्यायामालाही सुरुवात करायला हवी.

? ३ वैमानिक होण्यासाठी किती विषयांची लेखी परीक्षा द्यावी लागते?

✔ १ एनईएफटीद्वारे कितीही पैसे पाठवता येऊ शकतात.

दोस्तहो, विक्रमांची दुनिया अजब आणि अतर्क्य. चला तर, विक्रमांच्या पोतडीत या वेळी काय काय आहे ते बघूया.



# विक्रमांची अजब दुनिया



## उंचावरचे धरण

**नदीचं पाणी अडवण्यासाठी धरण बांधलं जातं हे आपण सगळेच शिकतो. आपल्या गावात किंवा शहराच्या बाहेर एखादं धरण किंवा छोटा बंधाराही असतो.** असंच एक धरण स्वित्झर्लंडमध्ये आहे. ते जगातलं सर्वाधिक उंचीवर बांधलेलं सिमेंट-काँक्रिटचं धरण आहे. डिक्सेन्स नदीवर बांधलेल्या या धरणाचं नाव 'ग्रेट डिक्सेन्स' असं आहे. १९५३ ते १९६१ या कालावधीत धरणाचं बांधकाम करण्यात आलं. धरणाची उंची ९३५ फूट (२८५ मीटर) आहे. त्याची लांबी ७०० मीटर असून त्यासाठी सुमारे ५९ लाख ६० हजार क्युबिक मीटर काँक्रिट वापरण्यात आले होते. मित्रांनो, जगातील उंचावरच्या धरणाची माहिती तुम्हाला मिळाली. आता तुम्ही आपल्या महाराष्ट्रातील सर्वांत मोठ्या धरणाची माहिती मिळवा व ती तुमच्या वहीत लिहा.



## विषारी मुंगी

**लाल मुंगी चावली, की आपण लगेच 'आई गं' असं म्हणतो. त्यावर औषधी मलम लावतो. एक-दोन दिवसांत बरंही वाटतं. मात्र, जगातील सर्वांत धोकादायक मुंग्या कुठे आढळतात, हे तुम्हाला माहीत आहे का?** ऑस्ट्रेलियाच्या सागरी किनाऱ्यांच्या प्रदेशात या लाल, विषारी मुंग्या आढळतात. त्यांना 'बुलडॉग अॅन्ट' असं म्हणतात. या मुंगीने कडकडून चावा घेतल्यास पुढील १५ मिनिटांच्या आत त्या व्यक्तीचे प्राण जाऊ शकतात. या मुंगीची लांबी २० मिलिमीटर, वजन ०.०१५ ग्रॅम आणि आयुष्य साधारणतः २१ दिवसांचं असतं. या प्रजातीचा १७९३ मध्ये पहिल्यांदा शोध लागला. स्थानिक लोक या मुंग्यांपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी नानाविध उपाययोजना करत असतात.


## केकची मोठी मेजवानी

**दोस्तांनो, तुम्हाला सगळ्यांना केक आवडत असेलच ना? वाढदिवसाच्या दिवशी तुम्ही आवडीचा केकही खात असाल.** मात्र, अमेरिकेत केकची एक मोठी मेजवानी झाली होती. त्यात सुमारे १३ हजार पॅनकेक होते, हे तुम्हाला माहीत होतं का? हाय-वी या कंपनीने २०२१ मध्ये हा विश्वविक्रम केला आहे. यासाठी १८ शेफ सतत ७ तास काम करत होते. एका सूपरमार्केटच्या 'मेन्यू'मध्ये केक नव्याने समाविष्ट करण्यात येणार होता. त्यासाठी हा विश्वविक्रम करण्यात आला. ह्या १३ हजार केकचे नंतर गरजूंना वाटप करण्यात आले.





## धोकादायक झाड

झाडं आपल्याला विविध प्रकारे मदत करतात हे आपल्याला माहीत आहेच. पर्यावरण रक्षणासाठी झाडे लावा, झाडे जगवा ही शिकवणही आपल्याला दिली जाते. ती गरजेची आहे. मात्र, या विश्वात काही अत्यंत विषारी झाडंदेखील आहेत बरं का! मॅन्चेनील असं या झाडाचं नाव असून, ते अमेरिकेतील काही भागांत आढळतं. हे जगातील सर्वांत धोकादायक झाड आहे. त्याच्या खोडातून निघणारा रस विषारी असतो. या रसाचा त्वचेला स्पर्श झाल्यास फोड येतात. डोळ्यांना स्पर्श झाल्यास अंधत्व येऊ शकतं. या झाडाखाली पावसात उभं राहणंही धोकादायक आहे. या झाडाच्या खोडावरील पाणी अंगावर पडलं तरी फोड येतात. याचं फळ चुकून खाल्लं तरीदेखील ते प्राणघातक ठरू शकतं. हे झाड जाळल्यावर त्यातून निघणारा धूरही विषारी असतो.



स्क्रीन टाइम

अनीश प्रभुणे



# द इनक्रेडिबल्स

**सुपरहिरोचे अनेक सिनेमे आपण पहिले आहेत. त्यापैकी काही तर पाहून पाहून पाठही झाले असतील. मात्र, 'सुपर कुटुंब' आणि त्यांची धमाल पहिली आहे का? नाही ना? मग आज आपण अशाच एका सुपर कुटुंबाची ओळख करून घेणार आहोत. त्याचे नाव आहे - द इनक्रेडिबल्स!**

**यामध्ये आहे मिस्टर इनक्रेडिबल. तोच आपला नायक! हा १९५० च्या दशकातील पारंपरिक सुपरहिरो आहे.** तो शहरात गुन्हेगारीविरुद्ध लढतो आणि धोक्यात असलेल्या नागरिकांचे जीव वाचवतो. दुर्दैवाने, सर्वसामान्य जनता एकमताने त्याच्या बाजूने राहत नाही. त्यामुळे त्याच्यावर बेकायदेशीर बचाव आणि त्यामुळे होणारे काही गंभीर परिणाम या कारणास्तव खटले दाखल होतात. त्याला जबरदस्ती निवृत्त होण्यासाठी भाग पाडले जाते. सरकारच्या सुपरहिरो पुनर्वसन कार्यक्रमाअंतर्गत मिस्टर इनक्रेडिबल त्याची पत्नी इलास्टिगर्ल आणि त्यांची मुले वायलेट, डॅशियेल आणि लहान जॅक यांच्यासोबत एका उपनगरात राहायला जातो.

आता ते अधिकृतपणे 'पार' कुटुंब म्हणून जगतात. बॉब आणि हेलेन अशी त्यांची नावे असतात. बॉब एका विमा कंपनीत काम करतो. एका अत्यंत रटाळ कामात तो स्वतःला अडकवतो. आपली तगडी बॉडी छोट्याशा केबिनमध्ये कशीतरी बसवत तो जगतो. हेलेन मुलांना वाढवते आणि अगदी टिपिकल आई होऊन जाते. सर्वांचे डबे, अभ्यास आणि इतर सर्व काही करण्यात तिचा दिवस जातो. किशोरवयीन वायलेट तिच्या सुपरपॉवर समजून घेऊ लागते. तिला अदृश्य होता येतं आणि आपल्याभोवती अभेद्य कवच तयार करता येतं. डॅशियेल 'डॅश' म्हणून ओळखला जातो आणि तो अगदी विजेच्या वेगाने धावू शकतो. परंतु, शाळेतील धावण्याच्या स्पर्धांमध्ये धावताना त्याला आपली शक्ती लपवून अगदी हळूहळू धावावे लागते. संपूर्ण कुटुंबाला आपल्या सुपरपावर लपवून अगदी सामान्य लोकांसारखं आयुष्य जगावं लागतं. साहजिकच ह्या गोष्टींचा सगळ्यात जास्त त्रास या कुटुंबालाच होतो.

बॉबसोबत त्याचा मित्र आणि स्थलांतरित सुपरहिरो फ्रोजन आहे. तो गोष्टी गोठवू शकतो. ते दोघे बॉलिंग लीगशी संबंधित असल्याचा दावा करतात आणि हलके-फुलके सुपरहिरोइंग करण्यासाठी रात्री बाहेर पळतात. एक दिवस त्यांना मिरॅजच्या आव्हानाच्या रूपात त्यांचे पूर्वायुष्य खुणावू लागते. मिस्टर इनक्रेडिबल त्याही स्थितीत 'ओम्निड्रॉइड ७' नावाच्या रोबोटशी लढतो. हा रोबोट दुष्ट, पण बुद्धिमान असलेल्या सिंड्रोम नावाच्या व्हिलनने तयार केलेला आहे. सिंड्रोम त्याच्या लहानपणी मिस्टर इनक्रेडिबलचा खूप मोठा 'फॅन' असतो आणि त्याला मिस्टर इनक्रेडिबलबरोबर सुपरहिरो होऊन फाईट पण करायची असते. साहजिकच, लहान मुलाला आपला सहकारी करण्यास मिस्टर इनक्रेडिबल नकार देतो. हाच नकार आणि राग मनाशी धरून तो व्हिलन होतो.

सिंड्रोम हुशार असतो, तांत्रिकदृष्ट्या प्रगत आणि श्रीमंतही असतो. अनेक रोबोट आणि नानाविध यंत्रे जगावर सोडून तो सर्वत्र राज्य करू पाहत असतो. त्यामुळे मिस्टर इनक्रेडिबल आणि त्याचे कुटुंबीय या डेंजर व्हिलनला थांबवू शकतील का? हे तुम्ही स्वतः बघा. **एका सुपर कुटुंबाची ही सुपर गोष्ट 'हॉटस्टार'वर बघायला मिळेल. ही गोष्ट चुकवू नकाच! आणि हो, हिंदीत पहिलीत तर अजून मजा येईल. कारण मिस्टर इनक्रेडिबलचा आवाज सुपरस्टार शाहरुख खानने दिला आहे.**

### लक्षात ठेवा

- स्वतःवर असलेला विश्वास हीच प्रत्येक माणसाकडे असलेली खरी सुपर पॉवर.
- आपले कुटुंब, आपला परिवार हीच सगळ्यात महत्त्वाची ताकद!

माय रेसिपी

इतर मुलांच्या डब्यातील खाऊपेक्षा तुमच्या डब्यातील खाऊ रंगीबेरंगी असावा असं वाटत असेल, तर तुमच्यासाठी रेनबो सॅलड हा उत्तम पर्याय आहे. अनेक पदार्थ एकत्र असल्याने या खाऊची चवही प्रत्येक घासागणिक बदलते. त्यामुळे वेगवेगळ्या चवीचं खाण्याची आवड असणाऱ्या मुलांनी रेनबो सॅलड खाऊन बघायला हवं.

### प्रयोग करा

मित्रांनो, आपण यामध्ये वाफवलेली मोड आलेली कडधान्य टाकली आहेत. पण, तुम्ही वाफावलेली मटकी, हुलगा, हिरवा वाटाणा किंवा हरभराही टाकू शकता. शिवाय कमी अधिक प्रमाणात हिरव्या कोवळ्या पालेभाज्याही टाकू शकता. तुम्हाला जी चव आवडते त्या चवीचे जास्त पदार्थ टाकले तरीही चालते.

# रेनबो सॅलड

### साहित्य


**लाल :** एक वाटी डाळिंब दाणे किंवा एक वाटी किसलेले बीट किंवा टोमॅटो बारीक चिरलेला.
**पांढरा :** एक वाटी बारीक चिरलेला कोबी किंवा मुळा किंवा कांदा.
**केशरी :** एक वाटी किसलेले गाजर.
**हिरवा :** अर्धी वाटी बारीक चिरलेली भोपळी मिरची व एक वाटी वाफवलेले मोडाचे हिरवे मूग.
**इतर :** एक उकडलेला बटाटा, एक वाटी काकडी, मिरची, मीठ, मिरी पावडर, बारीक चिरलेली कोथिंबीर आणि दही.

### कृती

सर्व साहित्य एका पातेल्यात एकत्र करावे. आवश्यकतेनुसार मीठ, मिरेपूड, मिरची घालावी. दही निराळ्या डब्यात घेऊन जेवताना ऐनवेळी सॅलडमध्ये घातले तरी चालते. दही नको असल्यास तुम्ही आमचूर पावडर घालू शकता.

### उपयोग

पोटभरू आहार म्हणून रेनबो सॅलड ओळखले जाते. उत्तम पोषणमूल्ये देणारा वेट- लॉस डबा अशीही याची ओळख. स्थूल असलेल्या किंवा जादा वजन असलेल्या मुलांनी वजन कमी करायचे असल्यास न्यूनतम फॅट्स असलेला हा आहार प्राधान्याने घ्यावा.





# माय डिअर रेनडिअर



**मित्रांनो, तुम्ही सांताक्लॉजची गाडी पाहिली असेलच ना! आपल्याकडे जशी घोडागाडी किंवा बैलगाडी असते ना, तशीच सांताक्लॉजची रेनडिअरगाडी असते. नाव वाचूनच गंमत वाटली ना? आपण बहुतेक कार्टून्समध्ये पाहतो की, गिफ्ट देण्यासाठी सांताक्लॉज एका गाडीत येतो. त्या गाडीमध्ये भरपूर गिफ्ट ठेवलेली असतात. ती गाडी हवेत उडते, बर्फावर धावते, सांताक्लॉज त्या गाडीत लगाम धरून बसलेला असतो आणि सहा किंवा आठ रेनडिअर ती गाडी ओढत असतात. बरोबर ना? तर आपण आज जाणून घेणार आहोत सांताक्लॉजची गाडी ओढणाऱ्या याच रेनडिअर प्राण्याविषयी.**

## हरणांचाच **भाऊ**

रेनडिअर हा प्राणी हरणांच्याच कुळातील बरं का. म्हणजे काळवीट, बाराशिंगा, हरीण, रेनडिअर असे सगळे एकाच कुटुंबातले. थोडक्यात ही सगळी चुलत किंवा मावस भावंडंच. पण, प्रत्येक जण आपापल्या शरीररचनेनुसार वेगवेगळ्या भागात राहतात. रेनडिअर राहतात थंड प्रदेशात. म्हणजे अलास्का, कॅनडा, पूर्व युरोप, रशिया, स्कॅंडिनोव्हिया, मंगोलिया अशा प्रदेशांत रेनडिअर पाहायला मिळतात. त्यांच्याही काही उपजाती उत्तर ध्रुवाकडील टुंड्रा व तैगा वगैरे प्रदेशात राहतात. उत्तर अमेरिकेतही रेनडिअरची संख्या मोठी आहे. तिथं त्यांना कॅरिबू म्हणून ओळखलं जातं.



- **रेनडिअरचे आयुष्य साधारणपणे पंधरा वर्षांचं असतं.**
- **तो तासाला ३२ किलोमीटर धावू शकतो.**
- **उत्तमरीत्या पोहणारा प्राणी. अगदी थंड पाण्यातही उत्तम पोहण्याचं कसब.**
- **तो दोन माणसे बसलेली गाडी बर्फावरून ताशी अठरा किलोमीटर वेगानं ओढत नेऊ शकतो.**

## बिनधास्त **धावतो बर्फावर**

रेनडिअर बर्फात राहतो, बर्फात धावतो तरी त्याला थंडी वाजत नाही बरं का ? कारण रेनडिअरच्या त्वचेवर दाट लोकरीचा थर असतो. शिवाय त्या लोकरीवर पुन्हा दोन ते चार सेंटिमीटरचा केसांचा थर असतो. त्यामुळे रेनडिअरला बर्फातही थंडी वाजत नाही. थोडक्यात निसर्गानेच त्याला स्वेटर घातलेला असतो, असं म्हणायला हरकत नाही. तर अशा रेनडिअरच्या पायाचे खूर रुंद व पसरट असतात. खूर म्हणजे तळपायाचा कठीण भाग बरं का. तुम्ही घोड्याचे, बैलाचे किंवा गाईचे खूर पाहिले असतीलच ना. तसेच पण रुंद आणि पसरट असे खूर रेनडिअरचे असल्यानं त्यांना बर्फावर चालणं सहजशक्य असतं.

## 'प्युअर' **शाकाहारी**

**रेनडिअर प्युअर शाकाहारी असतात बरं का. हरणांप्रमाणेच तेही झाडांची कोवळी पानं आणि लुसलुशीत हिरवं गवत खातात. रेनडिअर कळप करून राहतात. पण, सप्टेंबरच्या अखेरीस दाट वनात स्थलांतर करतात. ध्रुवीय अस्वले, गरुड आणि लांडगे हे त्यांचे शत्रू. गेल्या अनेक वर्षांपासून रेनडिअर माणसांच्या सहवासात आल्यामुळे ते माणसाळले आहेत. आपल्याकडे ज्याप्रमाणे गाई, म्हशी, मेंढ्या, शेळ्या पाळल्या जातात, त्याप्रमाणे रशियामध्ये रेनडिअर पाळले जातात.**

## वजनदार **प्राणी**


1 रेनडिअरचा रंग प्रामुख्यानं करडा किंवा तपकिरी असतो. त्यांचं पोट पांढरं किंवा फिकट करड्या रंगाचं असतं. त्यांच्या शरीरावर जी लोकर असते त्याला फर म्हटलं जातं. ही फर रेनडिअरच्या उपजातीनुसार आणि ते राहतात त्या परिसरानुसार पुन्हा बदलत जाते. म्हणजे दोन ठिकाणचे रेनडिअर एकाच जातीचे असले तरी ते वेगळ्या परिसरात राहत असतील तर त्यांच्या फरचा रंग बदलतो.

2 उत्तर ध्रुवापासून आपण जसजसे दक्षिणेकडे जाऊ तसतसे रेनडिअरचे आकार लहान होत जातात. म्हणजे उत्तरेकडचे रेनडिअर उंच आणि धिप्पाड असतात. त्यामानाने इतर ठिकाणचे थोडे लहान असतात. नर रेनडिअरची लांबी सहा ते सात फूट तर मादी रेनडिअरची लांबी पाच ते सात फूट असते. दोघांचीही उंची साधारणत: तीन ते पाच फुटांच्या दरम्यान असते.

## असं का?...

डॉ. दीप्ती सिधये

## फुलं रंगीबेरंगी का असतात?



**मित्र-मैत्रिणींनो, 'गवतफुला रंगरंगुल्या, सानसानुल्या, गवतफुला रे गवतफुला; असा कसा रे सांग लागला, सांग तुझा रे तुझा लळा' ही इंदिरा संत यांची कविता तुम्हाला माहिती असेलच.** खरंच, फूल न आवडणारा माणूस सापडणारच नाही. फुलांच्या बाबतीत सर्वांत आधी लक्षात येणारी गोष्ट म्हणजे त्यांचा रंग आणि सुगंध! इंद्रधनुष्यातल्या प्रत्येक रंगांचं फूल असतं, पण त्या रंगांच्या अनेक छटांचीही फुलं असतात. फुलांना हे रंग का असतात बरं? केवळ माणसाला ती डोक्यात, हारात घालता यावीत, सजावटीसाठी वापरता यावीत म्हणून? छे छे ! आपल्या सुंदर रंगांमुळे फुलं पक्ष्यांना, फुलपाखरांना, अन्य कीटकांना आकर्षित करतात. रंगांच्या ओढीने आलेले पक्षी आणि कीटक परागीभवनाचं काम करतात आणि फलधारणा होते. या फळांमधल्या बिया रुजल्या की पुढे त्यांची रोपं होणार. रोपं वाढली की, त्यांची झाडं होणार. मग त्या झाडांना पुन्हा रंगीबेरंगी फुलं येणार. ही रंगीत फुलं पुन्हा पक्षी आणि कीटक यांना आकर्षित करणार आणि निसर्गाचं चक्र अव्याहतपणे सुरू राहणार.

## डीएनए म्हणजे काय?

**दोस्तांनो, 'ती आणि तिची सख्खी बहीण या दोघी त्यांच्या आजीसारख्या दिसतात' किंवा 'त्याचे डोळे सेम टू सेम त्याच्या आईसारखे आहेत आणि नाक बाबांसारखं' अशा प्रकारचे संवाद तुम्ही नक्कीच ऐकले असतील.** आता आपण समजून घेऊया की, हे साम्य ज्याच्यामुळे असतं तो 'डीएनए' कसा असतो? आपण मानव आणि इतर सर्व सजीवांमधील जनुकीय घटक (जेनेटिक मटेरियल) ज्यापासून बनतं तो रेणू म्हणजे 'डीएनए' अर्थात 'डीऑक्सिरायबोन्यूक्लिक ॲसिड'. एखाद्या हेलिक्स म्हणजेच गोलाकार वळणाऱ्या शिडीसारख्या दिसणाऱ्या या रेणूला 'डबल हेलिक्स' असेही म्हणतात. शिडीचे उभे दांडे साखर आणि फॉस्फेटच्या रेणूंचे असतात. ॲडेनाइन (ए), थायमिन (टी), ग्वानाइन (जी) आणि सायटोसीन (सी) या चार न्यूक्लियोटाइड अर्थात बेसेसपैकी ॲडेनाइन (ए), थायमिन (टी) या दोन्हींची 'एटी' ही एक बेस जोडी असते, तर ग्वानाइन (जी) आणि सायटोसीन (सी) यांची 'जीसी' ही दुसरी बेस जोडी असते. एखादी आडवी दांडी 'एटी' ह्या बेस जोडीपासून बनते, तर दुसरी एखादी 'जीसी' या बेस जोडीपासून. अशा या 'डीएनए'चे रेणू एकमेकांशी जोडून गुणसूत्र (क्रोमोझोम) ही 'डीएनए'ची दीर्घ साखळी बनते. माणसाच्या शरीरातील प्रत्येक पेशीच्या केंद्रस्थानी क्रोमोझोमच्या तब्बल २३ जोड्या असतात.



## समुद्राचं पाणी खारट का असतं?

**समुद्राचं पाणी अगदी खारट असतं. महासागरांनी पृथ्वीच्या पृष्ठभागाचा सुमारे ७० टक्के भाग व्यापला आहे आणि त्यातील सुमारे ९७ टक्के पाणी खारट आहे.** थोडक्यात काय, आपल्या ग्रहावर भरपूर खारट पाणी आहे. काही अंदाजांनुसार, जर समुद्रातील मीठ काढून टाकले आणि पृथ्वीच्या पृष्ठभागावर समान रीतीने पसरले, तर ते ४० मजली कार्यालयीन इमारतीच्या उंचीच्या म्हणजेच ५०० फुटांपेक्षा जास्त जाडीचे थर तयार करेल. हे सर्व मीठ आले कुठून? समुद्रातील मीठ जमिनीवरील खडकांमधून येते. जमिनीवर पडणाऱ्या पावसात आजूबाजूच्या हवेतून काही प्रमाणात विरघळलेला कार्बन डायऑक्साइड असतो. यामुळे पावसाचे पाणी कार्बोनिक ॲसिडमुळे आम्लयुक्त होते. पावसामुळे खडकांची भौतिक झीज होते आणि आम्ल रासायनिक रीतीने खडक तोडून टाकतात आणि क्षार आणि खनिजे विरघळलेल्या अवस्थेत आयन (ion) म्हणून वाहून नेतात. समुद्राच्या पाण्यात क्लोरिन आणि सोडियम हे दोन आयन असतात. ते दोन्ही एकत्रित येऊन सोडियम क्लोराइड अर्थात आपल्या नेहमीच्या मिठाची निर्मिती करतात. त्यामुळे समुद्राचं पाणी खारट असतं.

? ५ रेनडिअरची धावण्याची क्षमता किती आहे?

✔ ८ 'पिंक पँथर'चा जन्म झाला १९६३ मध्ये झाला.

# संस्कार

## सुभाषित

**उत्साहसंपन्नमदीर्घसूत्रं क्रियाविधिज्ञं व्यसनेष्वसक्तम् ।
शूरं कृतज्ञं दृढसौहृदं च लक्ष्मीः स्वयं याति निवासहेतोः ।।**

ज्याच्या अंगी सळसळता उत्साह आहे, ज्याला कामाचा उरक आहे, ज्याला काम करण्याची रीत माहीत आहे, ज्याला कुठलेही व्यसन नाही, जो साहसी आहे, जो दुसऱ्याने केलेल्या उपकारांची जाणीव ठेवतो आणि जो मित्रांशी अतूट नाते जोडतो अशा माणसाकडे लक्ष्मी आपणहून मुक्कामाला येते.

## गीता श्लोक

**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।
मा कर्मफलहेतुर्भुर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ॥**

केवळ कर्मावरच तुझा अधिकार आहे. फळावर नाही. फळावर दृष्टी ठेवून कर्म करू नकोस आणि कर्म न करण्याचाही आग्रह धरू नकोस.

## सुविचार

कष्ट आणि सेवा यातच खरा आनंद आहे. जे दुसऱ्यांसाठी झटतात त्यांनाच खऱ्या आनंदाचा आस्वाद घेता येतो.

**- नेताजी सुभाषचंद्र बोस**

## दिनविशेष




**२५ डिसेंबर**

**२०१४ : भारताचा तरुण प्रतिभाशाली बॅडमिंटनपटू के. श्रीकांत याने जागतिक क्रमवारीत 'टॉप फाइव्ह'मध्ये स्थान मिळविले.**



**२७ डिसेंबर**

**२००९ : हरियानाच्या हितेशचा गुणाधिक्यावर पराभव करत दिल्लीच्या जोगिंदरने 'हिंद केसरी'च्या गदेवर आपले नाव कोरले.**



**२८ डिसेंबर**

**२०१४ : राज्यातील प्रतिष्ठेच्या 'महाराष्ट्र केसरी'चा मान जळगावच्या विजय चौधरीला.**

## बोधकथा

**प्रशांत सरुडकर**



## रिकामी बडबड

**जंगलातील सुंदर अशा सरोवरात कंबुग्रीव नावाचे कासव राहत होते. सुंदर असे वातावरण, हिरवीगार झाडी, तळ्यामध्ये मुबलक असणारे खाद्यपदार्थ यामुळे कंबुग्रीव अतिशय आनंदात असायचे.** त्या तळ्यात दररोज मासे खाण्यासाठी येत असणारे, संकट आणि विकट नावाचे दोन हंस त्याचे मित्र बनले. भोजन झाले की, तिघेही गप्पा मारत बसायचे. तिघांनाही एकमेकांशिवाय करमत नव्हते. एके वर्षी पावसाचा एक थेंबही पडला नाही. सगळ्या जंगलातील पशुपक्षी, प्राणी हवालदिल झाले. नद्या आटल्या, तळी, विहिरी कोरड्या पडल्या. सरोवरातलेही पाणी आटून गेले. त्या दोन हंसांना कासवाची काळजी वाटू लागली. कासवही हंसांना म्हणाले, ''मित्रांनो, या तळ्यातील पाणी आटले. मला आता इथे राहणे अवघड आहे. या दुष्काळात मी जगत नाही. तुम्ही दुसऱ्या सरोवराकडे जा, म्हणजे तुमचा तरी जीव वाचेल.'' यावर हंस म्हणाले, ''मित्रा, तुला सोडून जाणे आम्हाला बरे दिसत नाही. संकटकाळी मदतीला मित्र येणार नाही तर कोण येणार?'' यावर संकट आणि विकट यांनी दुसऱ्या जंगलात जाऊन एक सरोवर शोधून काढले. ते पाण्याने काठोकाठ भरलेले होते. ते परत कंबुग्रीव याच्याकडे आले व त्याला त्या सरोवराविषयी सांगितले. कासव म्हणाले, ''असे करू. तुम्ही दोघे जण चोचीत एक काठी धरा. मी मध्यभागी त्या काठीला पकडतो आणि मग आपण तिघे मिळून त्या सरोवरात जाऊ.'' कासवाची युक्ती दोघांनाही आवडली. ते म्हणाले, ''मित्रा, पण एक अडचण आहे. आपण आकाशातून प्रवास करत असताना, तू तोंड उघडता कामा नये. आम्हाला भीती वाटते, कारण तुला बडबड करायची फार सवय आहे. यावरती कंबुग्रीव म्हणाला, ''नाही रे मित्रांनो, मी अगदी काठीला गच्च पकडून राहीन. एक शब्दही बोलणार नाही.''

दुसऱ्या दिवशी सकाळी संकट आणि विकट कंबुग्रीवाला घेऊन निघाले. वाटेत एका नगरातून जात असताना, तेथील लोकांनी या तिघांना पाहिले व आश्चर्याने ओरडायला सुरुवात केली. गावातील लोकांची ही धमाल ऐकून कासवाला गप्प बसवेना. ते सहज बोलू लागले, ''मित्रांनो, कसली ही गडबड?'' कासवाने तोंड उघडल्याने ते जमिनीवर कोसळले. गरज नसताना रिकामे जास्त बोलू नये, यामुळे कंबुग्रीव कासवाचा जीव गेला. कधी बोलावे आणि कधी बोलू नये, हे लक्षात आले पाहिजे.

## टाइम मॅनेजमेंट

**सुप्रिया पुजारी,** लाइफ कोच, समुपदेशक

## तुमचा मूड कसा आहे?

**अर्जुनची परीक्षा नुकतीच संपली. त्यानंतर शाळेची सहल ठरली. दंगामस्ती करत सहल सुरू झाली, एक गेम खेळायचा ठरला.** एका बॉक्समध्ये आपण सर्वांत जास्त वेळा अनुभवलेल्या मूड्सच्या चिठ्ठ्या बनवून टाकायचे ठरले. सर्वांनी आपले आपले मूड लिहून बॉक्समध्ये टाकले. अर्जुननेसुद्धा मूड्स लिहिले. नंतर एकमेकांच्या चिठ्ठ्या वाचायचं ठरले. अर्जुनच्या असं लक्षात आलं की अनेक जणांनी फक्त चांगलेच मूड्स लिहिले होते. आनंद, उत्साह, प्रेरणा इत्यादी. अर्जुनला प्रश्न पडला की मी तर आनंद, उत्साह सोबत भीती, राग असेही मूड्स लिहिले. मग माझ्यामध्ये काही चूक आहे का?

घरी परतल्यावर त्याने ही गोष्ट त्याच्या बाबांना सांगितली. हा प्रश्न मनमोकळ्यापणाने विचारल्याबद्दल बाबांनी सर्वप्रथम त्याचे खूपच कौतुक केले व त्याला समजावले. माणूस म्हटलं की, आपण अनेक मूड्स अनुभवत असतो. परिस्थितीनुसार आपले मूड्स बदलत असतात. त्यामुळे राग, आनंद, उत्साह असे अनेक मूड्स अनुभवणं अगदी सामान्य आहे. काहीच कारण नसताना सारखेच मूड बदलत राहिले तर त्याच्यावर काहीतरी मार्ग शोधून काढायला हवा. हे ऐकून अर्जुनला खरंच वाटलं की आपल्याला मूड्स येतात ते अगदीच खरे आणि नॉर्मल आहेत. म्हणजेच काय की आपल्याला ज्या वेळी इतर लोक कायमच आनंदी उत्साही राहतात असे सांगतात ते प्रत्येक वेळी तसंच असतं असं नाही. खालील मुद्दे पाहू.

- माणूस म्हटलं की प्रत्येक जण वेगवेगळ्या मूड्समधून जात असतो.
- कायम आनंदी राहण्याचा अट्टाहास सोडून द्या.
- एखाद्या परिस्थितीचा परिणाम आपल्यावर जसा होतो त्याप्रमाणे मूड बदलला तरी त्याला स्वीकारा.
- खराब मूड चांगला करण्यासाठी नक्कीच उपाय असतात, परंतु खराब मूड येताच कामा नये हे चुकीचे आहे.
- **लक्षात ठेवा :** खरा माणूस तोच जो सर्व मूड्सचा स्वीकार करतो व आपल्याला अनुकूल मूड आणण्याचा मार्ग काढतो.

## वाचू आनंदे...

## हसरी शाळा..!

मित्रांनो, आपण मागच्या अंकात कवितांची माहिती घेतली. त्याचप्रमाणे या वेळी प्रतिभा जगदाळे यांच्या 'हसरी शाळा' या बालकविता संग्रहाची माहिती घेऊया. लहान मुलांना भवताल, परिसरातील प्राणी, पक्षी, निसर्ग, नदी, शाळा, खेळाचे मैदान याबरोबर आजी-आजोबा, आई-बाबा अशा आवडणाऱ्या विषयांवरील कविता वाचनीय आहेत. मुलांचे भावविश्व समृद्ध करण्यासाठी, त्याचबरोबर मुलांवर संस्काराची हसतखेळत पेरणी करण्यासाठी हा संग्रह उत्तम कार्य करू शकतो. सर्वच कविता गेय असून मुलांना निश्चितच ठेका धरायला लावणाऱ्या आहेत. या कवितासंग्रहात एकूण ४० रचना आहेत. त्या अत्यंत सुलभ पद्धतीने मांडल्या आहेत.

## हाक वसुंधरेची

## भारतातील पर्वत

**मित्र-मैत्रिणींनो आपण सध्या पर्वतांविषयी माहिती घेत आहोत. आपण आज भारतातल्या पर्वतांविषयी माहिती घेऊ.** भारत हा दक्षिण आशियात असलेला महत्त्वाचा प्रदेश आहे आणि तो जवळजवळ ३० टक्के पर्वतांनी व्यापलेला आहे. भारतात अंदाजे १३,८५७ पर्वतांची नोंद आहे. भारतातल्या महत्त्वाच्या आणि मोठ्या पर्वतरांगा म्हणजे १) हिमालय २) अरवली पर्वत ३) पश्चिम घाट ४) पूर्वेचे घाट ५) सातपुडा आणि विंध्याचल पर्वतरांगा ६) काराकोरम आणि पीर पंजाल पर्वत.

भारतातली सर्वांत उंच पर्वत शिखरे आणि त्यांची माहिती घेऊ.

१) **कांचनगंगा :** ८५८६ मीटर उंच असलेले भारतातले सर्वांत उंच शिखर आहे. त्याच्या नावाचा अर्थ बर्फातली 'पाच खजिने' असा होतो. हे शिखर नेपाळ आणि भारत यांच्या सीमेवर आहे.

२) **नंदादेवी :** याची उंची ७८१६ मीटर असून ते गढवाल जिल्ह्यात, उत्तराखंड राज्यात आहे.

३) **कामेत :** याची उंची ७७५६ मीटर असून हेही गढवाल जिल्ह्यात, उत्तराखंडमध्ये आहे.

४) **सॉल्टरो कांगरी (K१०) :** हे ७७४२ मीटर उंच असून, काराकोरम पर्वतरांगांमध्ये लडाख राज्यात आहे.

५) **सासेर कांगरी I-K२२ :** हे शिखरही लडाख राज्यात, काराकोरम पर्वत रांगेत आहे. त्याची उंची ७६७२ मीटर आहे.

६) **मामोस्ट्राँग कांगरी- K३५ :** हे शिखर रिमो काराकोरम पर्वतरांगांत लडाख राज्यात आहे. त्याची उंची ७५१६ मीटर आहे.

७) **सासेर कांगरी II E :** हे सासेर काराकोरम पर्वतरांगेत, लडाखमध्ये आहे. त्याची उंची ७५१३ मीटर आहे.

८) **सासेर कांगरी III :** हे सासेर काराकोरममध्ये ७४९५ मीटरवर आहे.

## योग जीवन

**मनाली देव**

## भुजंगासन

**या आसनाची अंतिम स्थिती ही भुजंगाप्रमाणे म्हणजेच नागाप्रमाणे दिसते त्यामुळे त्याला भुजंगासन म्हटले जाते.**

### असे करावे आसन

- पोटावर झोपून करण्याचे हे आसन आहे.
- त्यासाठी प्रथम पोटावर झोपावे, त्यानंतर दोन्ही हातांचे तळवे खांद्याच्या रेषेत येतील किंवा छातीच्या रेषेत येतील असे शरीराच्या जवळ जमिनीवर टेकवावे.
- श्वास घेत डोकं, छाती व पोटाचा भाग सावकाश वर उचलावा.
- मान मागच्या बाजूला घ्यावी. मांडीपासून पायापर्यंतचे शरीर जमिनीवर टेकलेले असावे. दोन्ही हातांची कोपरं ताठ असावीत.
- हाताची बोटं जुळलेली असावीत. शक्य तेवढा वेळ आसनस्थितीमध्ये स्थिर राहण्याचा प्रयत्न करावा. आसनस्थिती सोडताना सावकाश श्वास सोडत पूर्वस्थितीत यावे.



### फायदा :

- या आसनाच्या नियमित सरावाने संपूर्ण शरीराला उत्तम ताण बसतो. पोटावर ताण आल्याने पचनसंस्थेचे त्रास कमी होतात.
- पाठीच्या कण्यावर दाब आल्याने कंबर, पाठदुखी, वात हे विकार कमी होतात. लवचिकता वाढते.
- छाती, खांदे व गळा येथील स्नायू ताणले गेल्याने तेथील भागांची कार्यक्षमता वाढते.
- लहान मुलांना उंची वाढवण्यासाठी उपयुक्त. फुफ्फुसांची ताकद वाढते.


**काळजी :**

- **पोटाची किंवा पाठीची शस्त्रक्रिया झाली असेल किंवा खांद्याचे तीव्र त्रास असल्यास वैद्यकीय सल्ला घेऊनच आसनाचा सराव करावा.**

## गुड मॅनर्स

## दुसऱ्यांना समजून घ्या...!

मित्र-मैत्रिणींनो, तुमची वर्गातील किंवा शेजारी राहणाऱ्या मित्र-मैत्रिणींबरोबर किरकोळ कारणांवरून भांडणे होत असतात. कधी कधी कारण नसताना भांडण विकोपाला जाऊन अबोला धरण्यापर्यंतची वेळ येते. यामागचे महत्त्वाचे कारण म्हणजे समोरच्याला समजून न घेणे. बहुतांश वेळा भांडणाचे कारण अगदी क्षुल्लक असते, परंतु ते समजून न घेतल्याने गैरसमज निर्माण होतात. त्यामुळे समोरच्या व्यक्तीला समजून घेणे खूप आवश्यक आहे. हिच बाब घरातही लागू होते बरं का. घरी आई-बाबा, आजी-आजोबा किंवा मोठी बहीण-भाऊ यांनी काही सांगितले की आपला तोल जातो. त्यांनी सांगितलेली गोष्ट तुमच्याच फायद्याची असते, याचा जराही विचार तुम्ही करत नाही. कारण समजून न घेता उगाचच आपला हट्ट करता. समोरच्या व्यक्तीचे ऐकणे आवश्यक असते. केवळ ऐकणे महत्त्वाचे नसून ते का सांगितले आहे, त्यामागची भावना समजून घेणेही गरजेचे आहे. समोरच्याला समजून घेतल्याने अनेक समस्यांना सहज तोंड देता येते. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आपल्याबद्दल काही गैरसमज असतील तर ते दूर होण्यास मदत होते. आणि हो समोरच्या व्यक्तीच्या भावना समजून घेणे, त्याची भूमिका समजून घेणे, हा व्यक्तिमत्त्व विकासाचा महत्त्वाचा भाग आहे. मग आता दुसऱ्या व्यक्तींना समजून घेणार ना.




? ६ विजय चौधरी 'महाराष्ट्र केसरी' कधी झाले?


✓ ३ वैमानिक होण्यासाठी प्रामुख्याने पाच विषयांची लेखी परीक्षा द्यावी लागते.



# घरच्या घरी प्रयोगशाळा...!

— अशोक तातुगडे

मित्र-मैत्रिणींनो, आपण आज एका महत्त्वाच्या विषयाची माहिती करून घेणार आहोत. तुम्ही कधी तरी दह्याचे लोणी तयार करताना बघितलं असेल किंवा स्वतःसुद्धा केलं असेल. या प्रक्रियेमध्ये आपण रवीच्या मदतीने दही घुसळतो. त्यात थोडे थोडे पाणी टाकत दह्यावर लोणी येईपर्यंत घुसळण करत राहतो. केंद्रोत्सारी शक्तिद्वारे हे लोणी तयार होतं. केंद्रोत्सारी ही गुरुत्वाकर्षणाच्या विरुद्ध प्रभाव असलेली शक्ती आहे. एखादा पदार्थ वेगात गोलाकार फिरत असतो, तेव्हा त्यामध्ये केंद्रापासून दूर जाण्याची शक्ती निर्माण होते. याचा उपयोग करून दोन स्वतंत्र घनतेच्या वस्तू वेगळ्या करता येतात. ही शक्ती गुरुत्वाकर्षणाच्या विरुद्ध असते. आपण आजच्या दोन्ही प्रयोगांत बघणार आहोत की, केंद्रोत्सारी शक्ती कसे काम करते!





## गोफणीची गंमत

**मित्रांनो! घनता मापनाची आवश्यकता आपल्याला वेगवेगळ्या रासायनिक प्रक्रिया करताना लागते. उदाहरणार्थ- खाद्यपदार्थ तयार करणे.**

**साहित्य :** टेनिसचा चेंडू, चार फूट लांबीची दोरी, छोटा रुमाल.

**कृती :** छोट्या रुमालामध्ये बॉल गुंडाळून त्याची चारही टोके छोट्या धाग्याच्या तुकड्याच्या साह्याने एकत्र बांधून त्यामध्येच दोरीचेही एक टोक बांधा. दोरीचे दुसरे टोक हातात घ्या व बॉल डोक्याच्या वर धरून गोल गोल फिरवा. बॉलच्या फिरण्याची दिशा-कक्षा ही जमिनीला समांतर असेल अशा पद्धतीने तो फिरवा. फिरवण्याचा वेग हळूहळू कमी करत ते थांबवा. हे करताना बॉलची स्थिती व वेग यांचे निरीक्षण करा.

**निरीक्षणे व निष्कर्ष :**
दोरीचे एक टोक धरून आपण उभे असतो, तेव्हा दुसऱ्या टोकाला बॉल त्याच्या वजनाने जमिनीच्या जवळ असतो. जेव्हा बॉल दोरीबरोबर डोक्याभोवती फिरवायला सुरुवात करतो व आपण वेग वाढवतो, तेव्हा तो जमिनीपासून वर वर जायला लागतो आणि नंतर जमिनीला समांतर रेषेत फिरत राहतो. त्या वेळी आपल्याला हातातल्या दोरीवर ताण पडत असल्याची जाणीव होते. आपण बॉल वेगात फिरवत असतानाच सोडून दिला तर, तो खाली न पडता पहिल्यांदा सरळ रेषेत लांब जातो आणि नंतर हळूहळू खाली पडतो.
यावरून आपल्या लक्षात येते की, बॉलवर केंद्रोत्सारी शक्ती काम करत असते जी गुरुत्वाकर्षणाच्या शक्तीच्या विरुद्ध असते. ती वस्तूला केंद्रापासून दूर ढकलत असते.
याच तत्त्वाचा वापर करून शेतकरी गोफण बनवतात. गोफण डोक्यावर गरागरा फिरवून दगड लांबवर फेकून पक्ष्यांना उडवून लावतात.

## फिरत्या पाण्याची जादू

**साहित्य :** तीन बारीक पण खूप घट्ट, न तुटणारे ३ फूट लांबीचे धागे. प्लॅस्टिकचा मोठा कप, पाणी.

**कृती :** प्लॅस्टिकच्या पेल्याच्या तळाला दाभणाच्या साह्याने एक छोटेसे छिद्र पाडा. कपाच्या वरच्या कडेला सारख्या अंतरावर तीन छिद्रे पाडा. तीन दोऱ्यांचे एक टोक प्रत्येक छिद्रातून ओवून त्यांची गाठ बांधा. संदर्भासाठी आकृती बघा. दोऱ्यांच्या दुसऱ्या बाजूंच्या तीनही टोकांची घट्ट गाठ बांधा. आता कपात निम्म्याहून थोडे जास्त पाणी घ्या व वरची तिन्ही टोके एकत्र धरा आणि खालच्या छिद्रावरती बोट ठेवा. त्यामुळे पाणी वाहून जाणार नाही. आता कप गोलाकार फिरवून तिन्ही दोऱ्यांना पीळ द्या. आता कपाच्या खालच्या छिद्रावर ठेवलेले बोट काढा आणि पेला सोडून द्या. दोऱ्यांचा पीळ सुटत जाऊन पेला वेगाने गोलाकार फिरू लागेल. थोडेसे पाणी वाहून जाईल, पण फिरण्याचा वेग वाढेल तसे पाणी गळण्याचे थांबेल व उलट पेल्यामध्ये पाणी वर चढताना दिसेल. पूर्ण पीळ सुटेल, तेव्हाच पाणी तळाच्या छिद्रातून गळायला सुरुवात होईल.

**निरीक्षण व निष्कर्ष :** आपल्याला असे दिसते की, पीळ नसलेल्या ग्लासातले पाणी खालच्या छिद्रातून वाहते. पण पीळ दिलेला ग्लास आपण सोडून देतो, तेव्हा तो वेगाने गरगर फिरतो व तळातल्या छिद्राखालचे बोट काढले तरी पाणी सांडत नाही.
पाणी खाली न पडण्याचे कारण म्हणजे ग्लासाच्या गरगर फिरण्याच्या वेगामुळे पाणीही गरगर फिरते आणि त्यात केंद्रोत्सारी बल निर्माण होते. पाणी गुरुत्वाकर्षणाच्या विरुद्ध म्हणजे वर जाण्याचा प्रयत्न करते. त्यामुळेच ते खाली पडत नाही. मात्र, ग्लास फिरायचा थांबतो, तेव्हा केंद्रोत्सारी बल त्यात नसते व पाणी परत खाली पडायला सुरुवात होते. केंद्रोत्सारी बलामुळे कमी घनतेचे पदार्थ द्रवामध्ये वरच्या बाजूला राहतात व जास्त घनतेचे पदार्थ तळाच्या बाजूला जातात. बऱ्याच आरोग्य चाचण्यांमध्ये या तत्त्वाचा वापर केला जातो. रक्तघटक, लघवी, वेगवेगळ्या जंतूंचे परीक्षण करण्यासाठी किंवा औषधे तयार करण्यासाठीही याच तत्त्वाचा उपयोग होतो.



## अ‍ॅप माझे

**वैभव गाटे**

# अमेझिंग फॅक्ट्ससाठी 'मेंटल फ्लॉस'




**कोळी जाळे कसे तयार करतो? जगातील सर्वांत मोठा शब्द कोणता? युनिकॉर्न घोडा हा कोणत्या देशाचा राष्ट्रीय प्राणी आहे? पर्यटक कोणत्या स्थळाला सर्वाधिक भेट देतात? बार्बी डॉलचे संपूर्ण नाव काय? असे अनेक प्रश्न तुम्हाला पडत असतील. तुमच्या अशा आगळ्यावेगळ्या प्रश्नांची उत्तरे तुम्हाला घरच्या घरी मिळतील. त्यासाठी तुम्ही 'मेंटल फ्लॉस' या संकेतस्थळाचा आधार घेऊ शकता. येथे तुम्हाला कधीही न ऐकलेल्या, न वाचलेल्या 'अमेझिंग फॅक्ट्स' जाणून घेता येतील. यामुळे तुमच्यातील जिज्ञासूवृत्ती कायम जागृत राहील.**

**कोठे उपलब्ध?**
https://www.mentalfloss.com/ या संकेतस्थळावर

**कोठे वापरता येणार?**
मोबाईल, टॅब्लेट, संगणक

**कोण वापरू शकते?**
इयत्ता ५ वी पुढील विद्यार्थी

**किंमत?**
सर्वांसाठी मोफत

### 'मेंटल फ्लॉस'बद्दल


'अमेझिंग फॅक्ट्स'ची माहिती देणारे मेंटल फ्लॉस हे विद्यार्थ्यांच्या पसंतीचे संकेतस्थळ मानले जाते. फॅक्ट्ससह विविध प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांना येथे उपलब्ध होतात. याशिवाय अनेक दिग्गज व्यक्तिमत्त्वांची माहितीही या संकेतस्थळावर देण्यात आली आहे. याशिवाय यावर विद्यार्थ्यांना कोणती पुस्तके वाचावीत याबद्दल मार्गदर्शन करण्यात येत असल्याने तुम्हाला वाचनाचीही गोडी लागेल.

### वैशिष्ट्ये

- जगभरातील अमेझिंग फॅक्ट्स जाणून घेता येणार.
- अनोख्या प्रश्नांवर उत्तरे मिळविता येणार.
- चित्रपट, संगीत, टीव्ही, पॉप कल्चर यासंबंधित अमेझिंग फॅक्ट्स समजून घेता येणार.
- पुरातत्त्व वास्तू, वास्तूकला याबाबत माहिती जाणून घेता येईल.
- विविध पुस्तकांबद्दलची माहिती समजून घेता येईल.
- देश-विदेशातील खाद्यसंस्कृतीची माहिती मिळेल.

## मिळवा विविध विषयांच्या नोट्स

**तुम्हाला जर सर्व विषयांच्या नोट्स, सारांश एकाच ठिकाणी उपलब्ध झाला तर, किती बरं होईल ना.** असं झालं, तर तुमचा अभ्यासही सोपा होईल आणि तुम्हाला विविध विषय समजून घेणं सहज, सोपे होईल. अशाच सर्व नोट्स, त्या-त्या धड्याचं सार तुम्हाला स्टडीनामा या संकेतस्थळावर उपलब्ध होतात. याशिवाय विद्यार्थ्यांनी अभ्यास कसा करावा? पालकांनी विद्यार्थ्यांकडून अभ्यास कसा करून घ्यावा? या टिप्सही या संकेतस्थळावर देण्यात आल्या आहेत.




### 'स्टडीनामा'बद्दल

स्टडीनामा या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांना अभ्यासाबद्दल विविध टिप्स देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांना अभ्यासात मदत करणे हे या संकेतस्थळाचे उद्दिष्ट आहे. स्टडीनामाद्वारे विद्यार्थ्यांना नोट्स, धड्याचा सारांश काढता येतो. इतिहास, भूगोलापासून ते गणितापर्यंत अशा अनेक विषयांच्या नोट्स येथे उपलब्ध आहेत.

### वैशिष्ट्ये

- ६ वी ते १२ वीच्या विविध विषयांच्या नोट्स, सारांश उपलब्ध.
- विविध धड्यांचा सराव करणे शक्य.
- अभ्यासासाठी, परीक्षेबाबत, शिक्षणाबाबत विविध टिप्स.
- गणित, इतिहास, भूगोलसह भौतिकशास्त्र, रसायनशास्त्राच्या नोट्सही उपलब्ध.
- सर्व नोट्स पीडीएफ स्वरूपात. नोट्स डाउनलोड आणि शेअरिंगची सुविधा

**कोठे उपलब्ध?**
- https://www.studynama.com/

**कोठे वापराल?**
- संगणक, मोबाईल, टॅब

**कोण वापरू शकते?**
- इयत्ता ६ वी पुढील विद्यार्थी

**किंमत?**
- सर्वांसाठी मोफत (लॉगिन आवश्यक)



**वाघ, चित्ता, बिबट्या पाहिला की आपल्याला धडकीच भरते. त्यांची डरकाळी ऐकून भल्याभल्यांची भंबेरीही उडते.** पण, कार्टून विश्वातील ‘पिंक पँथर’ म्हणजे मस्करी करणारा, प्रेक्षकांना खळखळून हसवणारा असा वाघ बरं का.

# गुलाबी वाघ पिंक पँथर





## १९६३

**मध्ये वॉर्नर ब्रदर्सने व्यंगपट आणि टेलिव्हिजन कार्टून मालिकांची निर्मिती करणाऱ्या डीएफई अर्थात डी-पॅटी-फ्रिलिंग (फ्रिज फ्रिलिंग आणि डेव्हिड एच. डे-पॅटी) एंटरप्रायझेसची स्थापना केली.** कालांतराने दिग्दर्शक ब्लेक एडवर्ड यांनी फ्रिलिंग आणि डे-पॅटी यांच्याशी संपर्क साधला आणि ‘द पिंक पँथर’ या नव्या चित्रपटासाठी पँथरची कलाकृती तयार करण्यास सांगितले. या कलाकृतीने पुढे अमेरिकेलाच नव्हे, तर जगाला हसवले. ‘द पिंक पँथर’ चित्रपटाने धुमाकूळ घातला आणि तिकीटबारीवर विक्रमी यश मिळवले.

युनायटेड आर्टिस्ट स्टुडिओने डी-पॅटी आणि फ्रिलिंग यांच्याशी करार करून अनेक पिंक पँथरच्या कलाकृतींची निर्मिती केली आणि ती लोकांच्या पसंतीस पडली. १९६९ मध्ये एनबीसी वाहिनीने मालिका रूपात द पिंक पँथर शोचे प्रसारण केले. ‘द इन्स्पेक्टर’, ‘द अँट अँड द एडर्वाक’, रोलँड अँड रॅटफिंक’ आणि ‘द टेक्सास टॉइ्स’ मालिकांचाही त्यात समावेश होता. पिंक पँथरची वाढती लोकप्रियता पाहून एनबीसीने ही मालिका दीड तासापर्यंत वाढवली. पिंक पँथर पाहून श्रोता खळखळून हसला नाही तर नवलच. शांत आणि थंड डोक्याने विचार करणाऱ्या पिंक पँथरची ऐटबाज चालही लोकांना खूपच आवडली. हेन्री मॅनसिनी यांचे पार्श्वसंगीत, संग्रहित हास्य तुषारांबरोबर (स्टॉक लाफ्टर) सांगितले जाणारे कथावर्णनही लोकांना भावले.





**पिंक पँथर भलताच मवाळ. तो कधी ओव्हरकोट घालतो. तर कधी हॅट, हेल्मेट, गॉगल. नाही तर तसाच फिरतो! मनसोक्त जगणारा असा हा वाघ.**

**पिंक पँथरच्या मालिका टॉम अँड जेरी, रोड रनर, ट्विटीची आठवण करून देतात. आपला पिंक पँथर कुत्र्यालाही घाबरतो. त्यामुळे इतर कोणी त्याला घाबरण्याचा प्रश्नच नाही. पिंक पँथरची ऐटबाज चाल सर्वांनाच भावणारी ठरली!**

## १९६४

मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘द पिंक फिंक’ने ऑस्कर पटकावले.

कुत्र्यालाही घाबरणारा वाघ अशी गमतीदार ओळख




**ॲनिमेटेड पिंक पँथरचे पात्र हे व्हिडिओ गेमबरोबरच विविध कंपन्यांच्या जाहिरातीसाठी देखील वापरले गेले. जगाला भुरळ पाडणाऱ्या अभिनेत्री ऐश्वर्या बच्चनला ‘पिंक पँथर’ची भुरळ पडली. २००९ मध्ये प्रदर्शित अमेरिकी विनोदी गूढ चित्रपट ‘द पिंक पँथर-२’ मध्ये ऐश्वर्या चमकली. या चित्रपटात ऐश्वर्याने सोनिया सोल्ड्रेंसचे पात्र साकारले होते.**





## ‘पिंक पँथर’च्या करामतीची जगाला भुरळ

**गुलाबी वाघ ही जरा विचित्र कल्पना वाटते. कारण आपण आतापर्यंत पट्टेरी, काळा वाघ पाहिलेला असतो. परंतु १९६३ मध्ये पिंक पँथरचा जन्म झाला आणि बच्चे कंपनीला गुलाबी पँथर असतो, असे वाटू लागले.** जगातील अनेक भागांत पिंक पँथरला वेगवेगळ्या नावाने ओळखले गेले. पिंक पँथर नाथू अँड पंगू, लिटल पॉल द पँथर, पिंको द पिंक पँथर या नावाने त्याला लोकप्रियता मिळत गेली. त्याच्या करामतीने जगाला भुरळ पडली. तो काही वेळा जाहिरातीतही चमकला. एका कंपनीचा तो शुभंकरही बनला. जपानमध्ये तर त्याच्या नावाने केक, तर ब्रिटनमध्ये वेफर्स विकले जात असत. त्याच्या गुलाबी रंगामुळे आक्रमकता कमी होऊन तो प्रेमळ वाटू लागला. हा पिंक पँथर न्यूझीलंडमध्ये ‘चाइल्ड कॅन्सर फाउंडेशन’चा शुभंकर होता. लोभसवाणा ‘पिंक पँथर हा हॉलिवूडचा शेवटचा महान कार्टून’ असेही म्हटले आहे.



अर्थमंत्र

# NEFT बद्दल जाणून घ्या

दोस्तांनो, तुम्ही घरात आई-बाबांच्या बोलण्यात ‘एनईएफटी’ हा शब्द ऐकला असेल. आई-बाबा किंवा मोठी भावंडे फोनवर बोलताना, ‘मला ही रक्कम एनईएफटी करा’ असं कोणाला तरी सांगताना तुम्ही ऐकलं असेल. मात्र, ‘एनईएफटी’ म्हणजे नक्की काय, हे तुम्हाला माहीत नसेल तर आपण त्याबाबतची माहिती जाणून घेऊया.



## ‘एनईएफटी’ म्हणजे काय?

1 एनईएफटी म्हणजे नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्स्फर. देशांतर्गत इलेक्ट्रॉनिक म्हणजे ऑनलाइन पद्धतीने पैसे पाठवण्याची ही सुविधा म्हणजे ‘एनईएफटी’. भारतीय रिझर्व्ह बँकेने २००५ पासून भारतीय ग्राहकांसाठी ही सुविधा निर्माण केली आहे.

2 तुमचं बँक खातं नसेल तरीदेखील तुम्ही जवळच्या एखाद्या बँकेत जाऊन तिथे रोखीने पैसे भरून मग तुम्हाला हव्या त्या बँक खात्यात पैसे ऑनलाइन जमा करू शकता. यालाच सोप्या शब्दांत एनईएफटी असं म्हणतात.

## एनईएफटीचे फायदे

- एनईएफटी करण्यावर कोणतेही बंधन नाही. त्यामुळे घराची खरेदी-विक्री यांसारखे मोठे आर्थिक व्यवहार करणंही सोपं होतं. या व्यवहारांची नोंदणीही होते. त्यामुळे कोणताही गैरव्यवहार होत नाही.
- एखाद्या बँकेत आपलं खातं नसेल, तरीदेखील आपण एनईएफटी करू शकतो. त्यामुळे तुमच्या जवळच्या बँकेतूनही या सुविधेचा लाभ घेणं शक्य आहे.
- तुम्ही खातेधारक नसाल तरीदेखील ५० हजार रुपयांची एनईएफटी तुम्ही करू शकता.


**खातेदाराची माहिती हवीच :** एनईएफटी सुविधेचा लाभ घेण्यापूर्वी तुम्हाला लाभार्थी खातेदाराबद्दलची माहिती ऑनलाइन का होईना, पण भरावी लागते. त्यामुळे खातेदाराचा खाते क्रमांक, बँकेचा आयएफएससी कोड अशी माहिती ऑनलाइन अर्जात द्यावी लागते. त्या माहितीची पडताळणी झाल्यावरच तुमचा अर्ज स्वीकारला जातो आणि मग व्यवहार पूर्ण होतो.

## पैसे कधी जमा होतात?

काही वर्षांपूर्वीपर्यंत केवळ सकाळी आठ ते संध्याकाळी सात वाजेपर्यंत ही सेवा उपलब्ध होती. त्यामुळे बऱ्याचदा आदल्या दिवशीचे पैसे दुसऱ्या दिवशी मिळायचे किंवा त्याहून अधिक वेळ लागायचा, पण १६ डिसेंबर २०१९ पासून ही सुविधा २४ तास सुरू ठेवण्यात आली आहे. त्यामुळे आता पैसे त्याच दिवशी इच्छित बँक खात्यात जमा होतात. यापूर्वी एनईएफटीचे व्यवहार बँकेच्या सुट्टीच्या दिवशी होत नव्हते आणि व्यवहारांवर १ ते २५ रुपयांपर्यंत शुल्कही भरावं लागत होतं. मात्र, रिझर्व्ह बँकेच्या नवीन निर्णयानुसार आता ही सेवा पूर्णपणे मोफत झाली आहे.

## ‘एनईएफटी’ कशासाठी?

मित्रांनो, यूपीआयबद्दल आपण जाणून घेतलं. त्यामुळे अगदी मोबाईलवरून एका क्षणात पैसे पाठवण्याची सुविधा उपलब्ध असतानाही एनईएफटीचा पर्याय का निवडावा, असा प्रश्न तुम्हाला पडत असेल. मात्र, एनईएफटीचा पर्याय निवडण्यामागे खालील प्रमुख कारणे आहेत.



- यूपीआयद्वारे पैसे पाठवताना बऱ्याचदा नजरचुकीने ते दुसऱ्याच्या खात्यात जमा होण्याची शक्यता असते. दोन खातेधारकांची नावे सारखी असल्यास मोबाईलवर नाव निवडताना हा गोंधळ होऊ शकतो. एनईएफटीमध्ये हा धोका नाही. तिथे संपूर्ण माहितीची खातरजमा झाल्यावरच पैसे पाठवले जातात.
- नाव आणि खाते क्रमांक जुळत नसल्यास बँक तशी माहिती तुम्हाला देते आणि व्यवहारात चूक होत नाही.
- एनईएफटीची नोंद आपल्याकडे असते आणि बँकेकडेही राहते.
- एनईएफटीद्वारे पैसे पाठवताना थोडा वेळ लागत असला, तरी ते खात्रीने त्याच माणसाच्या खात्यात जमा होतात.
- एनईएफटीद्वारे कितीही पैसे पाठवता येतात.

## मुलांनो, हे करून पाहा

1. आई-बाबांसोबत बँकेत जाऊन एनईएफटीची प्रक्रिया कशी करतात, याची प्रत्यक्ष माहिती जाणून घ्या.
2. एनईएफटी पूर्ण झाल्यावर तसा संदेश खातेधारकाच्या मोबाईलवर येतो. त्यामुळे आपल्याला त्याची माहिती मिळते. या प्रक्रियेचीही माहिती घ्या.
3. एनईएफटीची माहिती तुमच्या मित्र-मैत्रिणींनाही सांगा व त्यांच्याशी चर्चा करा.

स्मार्ट माहिती

**दोस्तांनो, गेल्या आठवड्यात आपण बचत कशी करायची हे बघितलं. बचत ही फक्त पैशांच्या स्वरूपातलीच नसते, तर इतर प्रकारांनीही बचत करता येते, हे आपण बघितलं. त्यामुळे तुम्ही स्वतः मिळवते नसलात, तरी बचत करू शकताच. आता आपण खर्चांवर नियंत्रण कसं ठेवायचं हे बघूया.**

# घरातल्या खर्चावर नियंत्रण



**मित्र-मैत्रिणींनो, ‘मी तर लहान आहे, घरातल्या जमा-खर्चाशी माझा काही संबंध नाही,’ असं तुम्ही म्हणू शकत नाही, बरोबर ना?** तुम्ही घरासाठी कोणत्या गोष्टी करू शकता, हे आपण बघतोय. तुम्ही विविध प्रकारची बचत करून पैसे कसे वाचवू शकता, याची काही उदाहरणं आपण बघितली. आता आपण खर्चांवर नियंत्रण कसं ठेवायचं ते बघूया. तुमच्यापैकी अनेक जण खर्च करताना नक्की आई-बाबांचा विचार करत असतील. जे करत नसतील त्यांनी या काही गोष्टी लक्षात घ्या.

### हट्टांवर नियंत्रण

तुम्ही अनेकदा मॉलमध्ये गेल्यावर, सिनेमाला गेल्यावर किंवा सहलीला गेल्यावर अनेक गोष्टींचा हट्ट करता. इतका, की आई-बाबांना अगदी जीव नकोसा करून टाकता. तुम्ही बघा, अनेकदा हट्ट करून तुम्ही ज्या वस्तू घ्यायला लावता, त्यांच्याकडे नंतर ढुंकूनसुद्धा बघत नाही. मग या वस्तूंसाठी कशाला हट्ट करायचा? थिएटर्समध्ये साधे पॉपकॉर्नसुद्धा प्रचंड महाग असतात. त्याच्यासाठी कशाला हट्ट करायचा? त्यापेक्षा ‘आत्ता माझ्यासाठी हे पैसे खर्च करू नका, पण नंतर मला अमुक गोष्ट नक्की घ्या’ अशी विनंती तुम्ही आई-बाबांना केली, तर ते जास्त खुष होतील, बरोबर ना?

### योग्य माहिती

योग्य माहिती घेऊन खर्चांवर कसं नियंत्रण ठेवता येईल बरं? सोप्पं आहे. समजा शाळेत तुम्हाला अमुक गोष्टीसाठी वह्या आणायला सांगितल्या आहेत. तुम्ही धाडकन् आई-बाबांना त्या वह्या आणायला सांगण्यापेक्षा कुणी कुणी कुठून घेतल्या आहेत याची मित्र-मैत्रिणींकडून माहिती घ्या. काही ठिकाणी वह्या कमी किमतीला; पण चांगल्या दर्जाच्या मिळू शकतात. ती माहिती आई-बाबांना द्या, म्हणजे आपोआपच वह्यांसाठीचा खर्च कमी होईल.

### वाढदिवसाचं अवडंबर

दोस्तांनो, वाढदिवस साजरे करायला तुम्हाला आवडतं. ते बरोबरच आहे. तुम्हाला सगळ्यांनी गिफ्ट्स द्याव्यात, तुमचं कौतुक करावं आणि तुम्हाला ‘स्पेशल’ बनवावं असं वाटत असतं. ते सगळ्यांनाच वाटतं. मात्र, वाढदिवस साधेपणानं, कल्पक पद्धतीनंसुद्धा साजरे करता येतातच की नाही? त्यासाठी खूप भाडं असणारे हॉल घेणं, फुगे आणि इतर सजावटीसाठी खूप पैसे खर्च करणं, सतराशे साठ पदार्थ तिथं ठेवणं ही गोष्ट योग्य आहे का? तुमची हौस तुमच्या आई-बाबांना परवडते का याचा तुम्ही कधी विचार केला आहे का? परिस्थिती खूप चांगली असली, तरीही वाढदिवसाला खूप पैसे खर्च करण्यापेक्षा आपण ते पैसे साठवून ठेवू आणि त्यातून एखादी ट्रिप करू, किंवा घरी अमुक एखादी वस्तू घेऊ असं तुम्ही आई-बाबांना नक्की म्हणू शकता.

### तुलना नको


दोस्तांनो, तुम्ही बघा अनेक ठिकाणी तुलना करून आई-बाबांना जास्त खर्चात पाडत असता. म्हणजे समजा टीव्ही घ्यायची चर्चा असेल, तर ‘माझ्या अमुक मैत्रिणीकडे इतका इंच टीव्ही आहे, आपणही तेवढा घेऊ’, कार घ्यायची चर्चा असेल तर ‘माझ्या अमुक मित्राकडे अमुक गाडी आहे आपणही तेवढी घेऊ’ अशा तुलना करून तुम्ही आई-बाबांना जास्त खर्चात पाडत असता. ती तुलना टाळली, की घरातले खर्च नक्की कमी होतील.

**अजून काय काय करू शकता? :** तुमच्या घरात आई-बाबा, आजी-आजोबा आणि इतर सदस्य खर्चांमध्ये बचत कशी करायची, यावर अनेकदा विचार करत असतात. तुम्हीही तुमच्या सूचना अशा वेळी नक्की द्या. आणखी काय काय करू शकता, याची यादी तुम्ही तयार करून बघा. तुमच्या आई-बाबांना ती यादी दाखवा. कदाचित तेही आणखी काही उदाहरणं तुम्हाला सांगतील. त्या उदाहरणांनुसार वागून बघा. तुमचे आई-बाबा नक्की खुष होतील.

? ९ एनईएफटीद्वारे किती पैसे पाठवता येतात?

✔ ६ विजय चौधरी २०१४ मध्ये ‘महाराष्ट्र केसरी’ झाले.

खालील कोड्यामध्ये रिकाम्या जागी योग्य अंक भरा.





खालील चित्रांतील फरक ओळखा.




छोटीशी अळी सफरचंदामध्ये अडकली आहे. तिला बाहेर निघण्याचा मार्ग दाखवा.




प्रत्येक अंकासाठी रंग निश्चित केला आहे, त्यानुसार रंग भरा.




डोकं चालवा आणि गणित सोडवा.



दोन सारख्या मांजरी शोधा आणि सर्व मांजरींच्या अंगावरील मासे शोधा.






# भिंतफोडी

डॉ. अमृता देशपांडे-देशमुख

**भिंतफोडी हा खेळ म्हणजे पकडा-पकडीचाच एक प्रकार आहे. पाचहून अधिक खेळाडूंमध्ये हा खेळ खेळता येतो. एका खेळाडूने बचाव करणाऱ्या फळीला भेदून बाहेर जाण्याचा हा खेळ आहे. त्यामुळे त्याला 'भिंतफोडी' असं म्हणतात. या खेळासाठी सर्व खेळाडू हातात हात धरून गोल करून उभे राहतात. गोलापासून शंभर मीटर अंतरावर एक रेषा आखून ती मर्यादारेषा समजली जाते.**

**कृती :**

- गोलामध्ये ज्याच्यावर राज्य आहे, तो खेळाडू उभा करायचा.
- राज्य घेणाऱ्या खेळाडूने गोलातून बाहेर पडण्यासाठी प्रयत्न करायचा आणि गोलावर उभ्या असलेल्या खेळाडूंनी त्याला प्रतिकार करायचा असतो.
- राज्य घेणाऱ्या खेळाडूने प्रतिकार करणाऱ्यांची भिंत फोडून आपली सोडवणूक करून मर्यादारेषेकडे सुसाट पळायचे असते आणि मर्यादारेषा ओलांडायची असते.
- ज्या दोन खेळाडूंच्या मधून राज्य घेणारा खेळाडू सुटला, त्या दोघांनी पाठलाग करून त्याला पकडायचं असतं.
- राज्य घेणाऱ्या खेळाडूला मर्यादारेषेला स्पर्श करण्यापूर्वी पकडले तर, पुन्हा त्यानेच डाव घ्यावा लागतो आणि राज्य घेणाऱ्या खेळाडूने मर्यादारेषा पार केली तर, पकडणाऱ्यांपैकी मागे असलेल्या खेळाडूने राज्य घ्यायचं असतं.
- यामध्ये राज्य घेणाऱ्या खेळाडूला पकडण्यासाठी बचाव करणाऱ्या गटाने धावत जाऊन पुन्हा त्याला गोलात घेणं असंही करता येतं.

**कौशल्ये :**

- या खेळात धावण्याचा वेग, चपळता, संपूर्ण शरीराची ताकद वाढीस लागते. राज्य घेण्यात ही सगळी कौशल्ये पणास लागतात. याशिवाय, आत्मविश्वास वाढतो, सावधान राहण्याची सवय लागते.
- सांघिक वृत्ती निर्माण होते. हा खेळ साखळी स्वरूपात खेळला जात असल्याने खूप मजा येते.
- हा खेळ कबड्डीसारखाच आहे. त्यामुळे कबड्डी, धावणे, फुटबॉल या खेळांसाठी पूरक म्हणून त्याचा सराव करता येतो.

# विषय - मराठी

## घटक क्र. २ - कार्यात्मक व्याकरण

शिष्यवृत्ती इयत्ता ५ वी

मीरा गोविंद

प्रिय मित्र-मैत्रिणींनो कार्यात्मक व्याकरणातील '**वचन**' या उपघटकाचा आपण अभ्यास करणार आहोत.

**वचन** - नामावरून जसे त्यांचे लिंग समजते, तसेच त्या नामाने दर्शविलेली वस्तू एक आहे की त्या वस्तू एकाहून अधिक आहेत हेही कळते.

- नामाचा संख्या सुचविण्याचा एक गुणधर्म आहे. त्यास वचन असे म्हणतात.
- **वचन या शब्दाचा अर्थ बोलणे.**

**वचनाचे मुख्य प्रकार :** १) एकवचन, 2) अनेकवचन

**उपप्रकार :** १) उभयवचनी, २) आदरार्थी बहुवचन

- **एकवचन :** जेव्हा एखाद्या नामावरून वस्तू एकच आहे ते कळते. तेव्हा ते त्याचे एकवचन असते.
  **उदा.** पुस्तक, आंबा, पोळी, घर, ससा
  **एकवचनी सर्वनाम :** मी, तू, तो, ती, ते, जो, इ.
- **अनेकवचन :** जेव्हा एखाद्या नामावरून वस्तू अनेक आहेत हे कळते, तेव्हा ते त्याचे अनेकवचन असते.
  **उदा.** पुस्तके, आंबे, पोळ्या, घरे, ससे.
  **अनेकवचनी सर्वनामे :** आम्ही, तुम्ही, ते, त्या, ती, जे ह्या, त्या.
- **वचनभेदामुळे नामाच्या रूपात होणारा फरक**

1) पुल्लिंगी नामाची अनेकवचने. **उदा.** राजे – राजा, रस्ता – रस्ते, घोडा – घोडे, मुलगा – मुलगे
वरील उदाहरणांवरून लक्षात येते, की **आकारान्त** पुल्लिंगी नामाचे अनेकवचन **एकारान्त** होते.
2) **अकारान्त**खेरीज इतर सर्व पुल्लिंगी नामाची रूपे दोन्ही वचनात सारखीच असतात. **उदा.** दिवस, वीर, वार, तीर, पथ, मार्ग.
3) स्त्रीलिंगी शब्दाचे नामाचे अनेकवचन. **उदा.** वीट – विटा, वेळ – वेळा, तारीख – तारखा, सून – सुना
**अकारान्त** स्त्रीलिंगी नामाचे अनेकवचन **आकारान्त** होते.
4) **आकारान्त** स्त्रीलिंगी नामाचे अनेक – वचन सारखेच राहते. **उदा.** शाळा – शाळा, दिशा – दिशा, गंगा – गंगा.
5) **उकारान्त** स्त्रीलिंगी नामाचे अनेकवचन **वाकारान्त** होते. **उदा.** सासू – सासवा, पिसू – पिसवा, ऊ – उवा, जाऊ – जावा.
6) **ईकारान्त** स्त्रीलिंगी शब्दाचे अनेक – वचन **एकारान्त** होते. **उदा.** पोळी – पोळ्या, साडी – साड्या, होडी – होड्या, खाडी – खाड्या.
7) **ओकारान्त** स्त्रीलिंगी शब्दाचे अनेकवचन **आकारान्त** होते. **उदा.** बायको – बायका.
8) नपुसकलिंगी, **अकारान्त** अनेकवचन **एकारान्त** होते.**उदा.** घर – घरे, फूल – फुले, चाक – चाके, मूल – मुले.
9) **उ-ऊकारान्त** नपुसकलिंगी नामाचे अनेकवचन **एकारान्त** होते. **उदा.** पिल्लू – पिले, वासरू – वासरे.
10) जेव्हा एखादे नाम वाक्यात न देता स्वतंत्र दिल्यास त्या नामाचे वचन ओळखताना एकवचन वा अनेकवचन सारखेच होत असेल, अशा वेळी ते नाम '**उभयवचनी**' असते.

| | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| **उदा.** | देव | देव |
| | प्रतिज्ञा | प्रतिज्ञा |
| | वकील | वकील |
| | राष्ट्रपती | राष्ट्रपती |
| | पंतप्रधान | पंतप्रधान |
| | वाघ | वाघ |

- **वचनाविषयी इतर नियम**

1) गटामध्ये अनेक वस्तू असतात, परंतू तो गटसमूह मानून एकवचनात येते. **उदा.** ढीग (अनेक नारळांचा ढीग) आठवडा (अनेक वारांचा आठवडा)
2) विशेष नाम आणि भाववाचक नाम ही एकवचनातच असतात.
3) काही नामे नेहमीच अनेकवचनात असतात. **उदा.** शहारे, हाल, रोमांच, डोहाळे.
4) विपुलता दाखविण्यासाठी काही शब्दांचे एकवचन वापरतात. **उदा.** मागील वर्षी **खूप आंबा** पिकला.
5) ज्या नामाचे अनेकवचन होताना त्यात काहीच बदल होत नाही, त्या नामाचे वचन वाक्याच्या **क्रियापदावरून** ठरवता येते. **उदा.** पोपट **पेरू खातो**. (पेरू- एकवचन) पोपटाने पेरू खाल्ले. (पेरू – अनेकवचन)
6) काही वेळा व्यक्ती एक असूनही त्यांच्यासाठी 'आदरार्थी बहुवचन' किंवा आदरार्थी अनेकवचन वापरतात. **उदा.** संत ज्ञानेश्वरांना... वडिलांसाठी... शिवाजी महाराजांनी इत्यादी.

### नमुना प्रश्न

1) खालीलपैकी निश्चितपणे एकवचनी शब्द कोणता?
(1) हत्ती (2) चित्ता (3) सिंह (4) वाघ

**स्पष्टीकरण** - एक हत्ती – अनेक हत्ती, एक चित्ता – अनेक चित्ते, एक सिंह – अनेक सिंह, एक वाघ – अनेक वाघ यामध्ये हत्ती, सिंह, वाघ ही उभयवचनी नामे आहेत. म्हणून पर्याय क्रमांक (2) हे बरोबर उत्तर आहे.

2) पुढील शब्दगटातील एकवचनी शब्द कोणता?
(1) बगळे (2) फळे (3) कावळे (4) तळे

**स्पष्टीकरण** -

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| बगळा | बगळे |
| फळ | फळे |
| कावळा | कावळे |
| तळे | तळी |

म्हणून बगळे, फळे, कावळे ही अनेकवचनी नामे आहेत व तळे हे एकवचनी नाम आहे. म्हणून पर्याय क्रमांक (4) हे उत्तर बरोबर आहे.

3) खालीलपैकी एकवचनी नाम कोणते?
(1) आज्ञा (2) दिशा (3) सभा (4) जाऊ

**स्पष्टीकरण** – एकवचन - आज्ञा, दिशा, सभा, जाऊ तसेच अनुक्रमे अनेकवचन आज्ञा, दिशा, सभा आणि जावा. म्हणून एकवचनी नाव जाऊ आहे पर्याय क्रमांक (4) हे उत्तर बरोबर आहे.

### सरावासाठी प्रश्न

**खालील प्रत्येक शब्दगटातील अनेकवचनी शब्दाचा पर्याय क्रमांकाचे वर्तुळ रंगवा.**

1] (1) चमचा (2) खडा (3) पेढे (4) ताटली
1 2 **3** 4
2] (1) मुली (2) चूल (3) मुलगा (4) स्त्री
**1** 2 3 4
3] (1) फळ (2) कळ (3) नळ (4) झळ
1 2 **3** 4
4] (1) वासरू (2) हरिण (3) डोळे (4) खेडी
1 2 3 **4**
5] (1) शीड (2) घर (3) खेळणी (4) कूळ
1 2 **3** 4
6] (1) काठी (2) गाठी (3) पाटी (4) वाटी
1 **2** 3 4
7] (1) वीज (2) बी (3) नथ (4) भिंती
1 2 3 **4**
8] (1) इमारत (2) रस्ते (3) नदी (4) टेकडी
1 **2** 3 4
9] (1) होड्या (2) विहीर (3) वरात (4) सुई
**1** 2 3 4
10] (1) घरटी (2) रोपटी (3) दिवटी (4) वाटी
**1** 2 3 4

**पुढील शब्दगटातील एकवचनी शब्दाच्या पर्याय - क्रमांकाचे वर्तुळ रंगवा.**

1] (1) मागणी (2) चाळणी (3) गोफणी (4) आठवणी
**1** 2 3 4
2] (1) दारे (2) पाखरे (3) गावे (4) नाणे
1 2 3 **4**
3] (1) खेडी (2) शेळी (3) गाणी (4) जाळी
1 **2** 3 4
4] (1) गाणे (2) घरे (3) पुस्तके (4) वासरे
**1** 2 3 4
5] (1) बहिणी (2) घागरी (3) म्हशी (4) भाकरी
1 2 3 **4**
6] (1) जावा (2) उवा (3) जळू (4) जळवा
1 2 **3** 4
7] (1) पंगती (2) मुलगी (3) सहली (4) नथी
1 **2** 3 4
8] (1) राणी (2) गोष्टी (3) खेडी (4) नाणी
**1** 2 3 4

**पुढील ठळक अक्षरांतील प्रत्येक शब्दाचे वचन बदलून त्यांच्या पर्याय क्रमांकाचे वर्तुळ रंगवा.**

1) नक्कल : 1) नक्कला 2) नकला 3) नकली 4) नक्कले
1 **2** 3 4
2) ठिकाण : 1) ठिकाणे 2) ठिकाणा 3) ठिकाणी 4) ठिकाण
**1** 2 3 4
3) उद्यान : 1) उद्यान 2) उद्याना 3) उद्यानी 4) उद्याने
1 2 3 **4**

**पुढील प्रत्येक प्रश्नात वचनबदलानुसार चुकीची जोडी असणारा पर्याय निवडून त्याचे वर्तुळ**

1] 1) दार – दारे 2) जाळे – जाळी 3) भाजी – भाज्या 4) फळा – फळा
1 2 3 **4**
2] 1) साल – साली, 2) माहिती – माहित्या 3) हत्ती – हत्ती 4) बैल – बैल
1 **2** 3 4
3] 1) मामा – मामा 2) चित्ता – चित्ता 3) वाघ – वाघ 4) काका – काका
1 **2** 3 4
4] 1) काटा – काटे 2) किल्ला – किल्ले 3) वीट – विटा 4) शाळा – शाळे
1 2 3 **4**

**पुढील प्रत्येक प्रश्नात दिलेल्या शब्दाचे, वचन ओळखून त्याच्या पर्याय क्रमांकाचे वर्तुळ रंगवा.**

1] हाल : 1) एकवचन 2) अनेकवचन 3) उभयवचन 4) आदरार्थी बहुवचन
1 **2** 3 4
2] वडिलांनी : 1) एकवचन 2) अनेकवचन 3) उभयवचन 4) आदरार्थी बहुवचन
1 2 3 **4**
3] प्रतिज्ञा : 1) एकवचन 2) अनेकवचन 3) उभयवचन 4) आदरार्थी बहुवचन
1 2 **3** 4
4] रुपया : 1) एकवचन 2) अनेकवचन 3) उभयवचन 4) आदरार्थी बहुवचन
**1** 2 3 4

---

# विषय-मराठी

## घटक - कार्यात्मक व्याकरण; उपघटक - लिंग विचार

**भारांश - ४४%; अपेक्षित प्रश्नसंख्या – ०१; एकूण गुण - ०२**

शिष्यवृत्ती इयत्ता ८ वी

सौ.माधवी दत्तात्रय कुलकर्णी

नमस्कार विद्यार्थी मित्रमैत्रिणींनो, शिष्यवृत्ती परीक्षा अभ्यासक्रमात 'कार्यात्मक व्याकरण' या घटकाचा अभ्यास करीत असताना 'लिंग विचार' हा अतिशय महत्त्वाच्या घटकाचा अभ्यास आपल्याला करावा लागतो. या लेखाच्या माध्यमातून मराठी भाषेतील 'लिंग विचार' आपण करणार आहोत.

मराठी व्याकरणाचा अभ्यास करीत असताना आपण 'नाम' म्हणजे काय हे शिकलो आहोत. 'प्रत्यक्ष दिसणाऱ्या किंवा कल्पित वस्तूचे किंवा तिच्या गुणधर्माचे नाव दर्शवणाऱ्या विकारी शब्दाला नाम असे म्हणतात.'

**उदाहरणार्थ :** झाड, महेश, गाय, चकोर, धैर्य इत्यादी.

अशीच काही नामे वाक्यात वापरताना त्यांच्या रूपात कधी कधी बदल होताना आपल्याला दिसतो. आता खालील वाक्ये वाचा.

१) मुलगा पुस्तक वाचतो.
२) मुलगे खेळ खेळतात.
३) मुलगी गाणे गाते.
४) मुलांना खाऊ आवडतो.

वरील वाक्यात 'मुलगा' या शब्दाची 'मुलगी, मुलगे, मुलांना' अशी रूपे झालेली आहेत. नामांच्या रूपात हा जो बदल होतो किंवा विकार होतो त्यास 'विकरण' असे म्हणतात. हा बदल केव्हा व कसा होतो ते आपण पाहूया. 'मुलगा' याचे 'मुलगी' असे जे रूप बदलते ते त्याचे लिंग बदलल्यामुळे. 'मुलगे' असे जे रूप झाले ते 'वचन' बदलल्यामुळे व 'मुलांना' असे रूप झाले ते 'विभक्ती' बदलल्यामुळे.

लिंग, वचन व विभक्ती यांमुळे नामाच्या रूपात बदल होतो त्याला 'नामांचे विकरण' असे म्हणतात यांचा आपण क्रमाने विचार करणार आहोत. या लेखात आपण १) लिंग २) वचन व ३) विभक्ती यांपैकी 'लिंग विचार' अभ्यासणार आहोत.

'नामाच्या रूपावरून एखादी वस्तू वास्तविक अगर काल्पनिक पुरुष जातीची आहे, ती स्त्री जातीची आहे की दोन्हीपैकी कोणत्याही जातीची नाही असे ज्यावरून कळते त्याला त्या शब्दाचे 'लिंग' असे म्हणतात.' मराठी भाषेत तीन लिंगे मानतात :- १) पुल्लिंग २) स्त्रीलिंग ३) नपुंसकलिंग

**१) पुल्लिंग :-** पुरुष किंवा नर जातीचा बोध करून देणाऱ्या शब्दाला पुल्लिंगी शब्द म्हणतात.
**उदा.** डोंगर, सूर्य, घोडा, फळा, समुद्र, दगड

**२) स्त्रीलिंग :-** स्त्री किंवा मादी जातीचा बोध करून देणाऱ्या शब्दाला स्त्रीलिंग असे म्हणतात.
**उदा.** टेकडी, नदी, घोडी, खुर्ची, चिमणी

**३) नपुंसकलिंग :-** ज्या शब्दांमधून पुरुष किंवा स्त्री यांपैकी कोणत्याच जातीचा बोध होत नाही अशा शब्दांना नपुंसकलिंगी शब्द म्हणतात.
**उदा.** पुस्तक, झाड, मूल, टेबल, पाखरू

मराठीतील लिंग व्यवस्था ही अत्यंत अनियमित आणि धरसोडीची आहे. असे अभ्यासांती दिसून आले आहे. कारण मराठी भाषेत संस्कृत, इंग्रजी तसेच अन्य भाषांतील देखील शब्द समाविष्ट आहेत. त्यामुळे अमुक एखादा नियम लिंगविचार करताना कायमचा लागू होत नाही. अर्थात त्यासाठी अपवाद असतात. परंतु ढोबळ मानाने वस्तूंच्या मागे तो, ती, ते हे शब्द लावून लिंग ओळखता येते. उदा. तो- खडू, ते - डस्टर, ती चिमणी, ते पाखरू, तो मुलगा, ती मुलगी, ते - मूल.

**खालील तक्ता पाहावा**

| पुल्लिंग | स्त्रीलिंग | नपुंसकलिंग |
|---|---|---|
| तो वाडा | ती इमारत | ते घर |
| तो भात | ती भाकरी | ते वरण |
| तो टाक | ती लेखणी | ते पेन |
| तो दिवा | ती पणती | ते तेज |

मराठीत अमुक एक शब्द पुल्लिंगीच का? स्त्रीलिंगी का? असे सांगणे कठीण आहे. केवळ रूढी, परंपरा हेच त्याचे उत्तर आहे. मराठी भाषा ही ऐकून व बोलण्यात तिचा वारंवार वापर करून तिच्यातील लिंग व्यवस्था आपल्याला समजून घेता येते.

केवळ नियमाने लिंग व्यवस्था ठरवता येत नाही. तरीसुद्धा लिंग विचारातील काही नियम आपण पाहणार आहोत.

**लिंग विचारातील नियम :**

१) 'आ'कारांत पुल्लिंगी प्राणिवाचक नामांचे स्त्रीलिंगी रूप 'ई'कारांत होते, तर नपुंसकलिंगी 'ए'कारांत होते.
**उदा. :** घोडा – घोडी – घोडे.
२) काही प्राणीवाचक 'अ'कारांत पुल्लिंगी नामांची स्त्रीलिंगी रूपे 'ई'कारांत होतात.
**उदा. :** बेडूक – बेडकी, दास – दासी, गोप – गोपी.
३) काही प्राणिवाचक पुल्लिंगी शब्दांस 'ईण' हा प्रत्यय लागल्यास त्याची स्त्रीलिंगी रूपे होतात.
**उदा. :** वाघ – वाघीण, सुतार – सुतारीण, माळी – माळीण.
४) काही शब्दांची स्त्रीलिंगी रूपे स्वतंत्र रीतीने होतात.
**उदा. :** बाप – आई, विधुर – विधवा, बोका – भाटी, मोर – लांडोर, उंट – सांडणी, वर – वधू, पती – पत्नी, बैल – गाय खोंड – कालवड, बोकड – शेळी
५) सामासिक शब्दांचे लिंग हे शेवटच्या शब्दाच्या लिंगाप्रमाणे असते.
**उदा. :** 'साखरभात' या सामासिक शब्दात 'भात' हा शेवटचा शब्द आहे. भात हा शब्द पुल्लिंगी आहे. म्हणूनच साखरभात या शब्दाचे लिंग पुल्लिंग असे मानले जाते.
मीठभाकरी – स्त्रीलिंग, देवघर – नपुंसकलिंग
६) गरुड, पोपट, मासा, साप हे शब्द पुल्लिंग व स्त्रीलिंग असून सुद्धा फक्त पुल्लिंग समजतात तर ऊ, घाट, पिसू, घूस, जळ हे शब्द पुल्लिंग असूनही त्यांचा उल्लेख केवळ स्त्रीलिंगीच करतात.
७) संस्कृतातून मराठीत आलेल्या नामांची स्त्रीलिंगी रूपे 'ई' प्रत्यय लागून होतात.
**उदा. :** राजा – राज्ञी, श्रीमान – श्रीमती, भगवान – भगवती,युवा – युवती, विद्वान – विदुषी.
८) मराठीतील काही शब्द निरनिराळ्या लिंगातही आढळतात. उदाहरणार्थ : बाग (पु. स्त्री.), ढेकर (पु., स्त्री.), पोर (पु., स्त्री, न.पुं), वेळ (पु. स्त्री.), हरीण (पु. न. पुं)

अशाप्रकारे वरील काही नियमांचा अभ्यास करून तसेच मराठी भाषा जास्तीत जास्त बोलल्याने, ऐकल्याने आणि वाचल्याने या भाषेतील शब्दसंपदा आणि तिची नियमव्यवस्था आपल्याला आपसूकच समजते.

### सराव प्रश्न

१) दुकानदाराने पुस्तकांचे '**गट्ठे**' बांधले. (अधोरेखित नामाचे लिंग ओळखा.
१) पुल्लिंग २) स्त्रीलिंग ३) नपुंसकलिंग ४ ) उभयलिंग

**स्पष्टीकरण :** गट्ठे या नामाचे प्रथम एकवचन 'गठ्ठा' केल्यावर त्याचे लिंग पुल्लिंग आहे. पर्याय क्रमांक (१) हे उत्तर आहे.

२) 'सम्राट' या नामाचे विरुद्ध लिंगी नाम कोणते?
१) सम्राट २) सम्राटी ३) सम्राज्ञा ४) सम्राज्ञी

**स्पष्टीकरण :** सम्राट-सम्राज्ञी हे योग्य विरुद्ध लिंगी नाम जोडी आहे इतर शब्द चुकीचे आहेत म्हणून पर्याय क्रमांक चार हे उत्तर आहे.

३) 'याद्या' या शब्दाचे लिंग कोणते?
१) पुल्लिंग २) स्त्रीलिंग ३) नपुंसकलिंग ४ ) उभयलिंग

**स्पष्टीकरण :** प्रथम 'याद्या' या शब्दाचे एकवचन करून घ्यावे. 'याद्या' या शब्दाचे एकवचन 'यादी' असे आहे. त्यामुळे यादी हे स्त्रीलिंगी नाम आहे. म्हणूनच पर्याय क्रमांक दोन हे उत्तर आहे.

४) पुढील सामासिक शब्दाचे लिंग ओळखा. - 'आमटीभात'
१) पुल्लिंग २) स्त्रीलिंग ३) नपुंसकलिंग ४ ) उभयलिंग

**स्पष्टीकरण :** सामासिक शब्दांचे लिंग हे शेवटच्या शब्दाच्या लिंगाप्रमाणे असते. असा नियम आपण वर पाहिला. त्या नियमानुसारच 'आमटीभात' या सामासिक शब्दात शेवटचा शब्द 'भात' या नामाचे लिंग पुल्लिंग आहे. पर्याय क्रमांक एक हे उत्तर आहे.

५) पुढील पर्यायातील योग्य पर्याय कोणता?
१) उट – उटणी २) उंट – उंटीण ३) उंट – उंटी ४) उंट – सांडणी

**स्पष्टीकरण :** उंट – सांडणी अशी नर मादी जोडी अचूक आहे. म्हणून पर्याय क्रमांक चार हे उत्तर आहे.

### नमुना प्रश्न

१) पुढीलपैकी विरुद्धलिंगी शब्दाच्या चुकीच्या जोड्या कोणत्या? (दोन अचूक पर्याय निवडा.) (फेब्रु. 2017)
१) आत्मज – आत्मजा २) महोदय – महोदया ३) अज – अजी ४) नर्तिका – नर्तन

२) '**शाखामृग**' या झाडावरून त्या झाडावर उड्या मारतो. या वाक्यातील अधोरेखित शब्दाचे विरुद्धलिंगी नाम कोणते? (फेब्रु. 2018)
१) वानरी २) हरिणी ३) सारिका ४) मृगी

३) पुढीलपैकी कोणती शब्दांची जोडी परस्परविरुद्धलिंगी शब्दांची नाही? (फेब्रु. 2019)
१) खडा – खडी २) पळा – पळी ३) युवा – युवती ४) महीष – महिषा


४) पुढीलपैकी लिंग प्रकारानुसार विसंगत असणारा शब्द पर्यायातून निवडा? (मे 2021)
१) मळे २) डोळे ३) कावळे ४) स्थळे

५) पुढीलपैकी पुल्लिंगी नाम कोणते? (फेब्रु. 2023)
१) गवळी २) साखळी ३) पाकळी ४) कवळी

• Registered • Date of Publication : शुक्रवार, २२ डिसेंबर २०२३ • Posted at BPC Vishrambagwada, CSO Pune Daily. • आर.एन.आय. MAHMAR-१५५७/५७, रजि. नं. पी.सी.डब्ल्यू./०६९/२०२१-२०२३.

## अर्शदीप सिंग

# स्विंग किंग




भारत आणि दक्षिण आफ्रिकेमध्ये १७ डिसेंबरपासून एकदिवसीय मालिका सुरू झाली. या मालिकेतल्या पहिल्याच सामन्यात भारताचा गोलंदाज अर्शदीप सिंगने ३७ धावा देत पाच फलंदाज बाद केले. दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्गमध्ये झालेल्या या सामन्यात अर्शदीपने खऱ्या अर्थाने इतिहास रचला. कारण दक्षिण आफ्रिकेविरुद्ध एकदिवसीय सामन्यात पाच बळी घेणारा तो भारताचा पहिलाच गोलंदाज ठरला आहे.



### अर्शदीप सिंग

**जन्म :** ५ फेब्रुवारी १९९९, गुणा, मध्य प्रदेश
**वय :** २४ वर्षे

### आंतरराष्ट्रीय पदार्पण

जुलै २०२२ मध्ये इंग्लंडविरुद्ध आंतरराष्ट्रीय टी-२० मध्ये भारतीय संघाकडून पदार्पण. अर्शदीप सिंग हा प्रामुख्याने मध्यम वेगवान गोलंदाज म्हणून ओळखला जातो.

### आयपीएल

- १६ एप्रिल २०१९ किंग्ज इलेव्हन पंजाब संघाकडून राजस्थान रॉयल संघाविरुद्धच्या सामन्यातून पदार्पण. या सामन्यात त्याने चार षटकांत दोन बळी घेतले.
- अवघ्या ३२ धावा देत पाच बळी घेणं ही आयपीएलमधील सर्वोत्कृष्ट खेळी.
- एका सामन्यात चार बळी घेणारा गोलंदाज.
- २०२३ च्या आयपीएलमध्ये घेतले एकूण १७ बळी.

### चौफेर कामगिरी

२०१८ मध्ये भरविण्यात आलेल्या १९ वर्षाखालील विश्वचषक सामन्यात अर्शदीपचा समावेश होता. या वेळी त्याने उत्तम खेळी केली होती. त्यानंतर काही महिन्यांनी २३ वर्षाखालील पंजाब संघामध्ये त्याचा समावेश झाला. त्या वेळी झालेल्या नायडू करंडकामध्ये त्याने राजस्थान संघाविरुद्ध कौतुकास्पद खेळी करत आठ बळी घेतले. त्यात एक 'हॅटट्रिक'सुद्धा होती.

### 20 लाख ते 4 कोटी रुपयांची घोडदौड

आयपीएल सामन्यात किंग्ज इलेव्हन पंजाब संघासाठी २०१९ मध्ये अर्शदीपसोबत २० लाख रुपयांचा करार करण्यात आला होता. पुढे तीन वर्षे कराराचा आकडा २० लाखच राहिला. मात्र, अर्शदीपने आपल्या खेळीमध्ये केलेल्या सुधारणेमुळे २०२२ मध्ये कराराची रक्कम २० लाखांवरून थेट ४ कोटी रुपयांवर गेली. २०२३ मध्येसुद्धा अर्शदीपशी ४ कोटी रुपयांचा करार करण्यात आला होता.

